# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2012-2014

YEAR : 38) 15th December 2013 (No. of Pages 16 ) ( No : 16

# शिक्षकांच्या प्रती एवढी आकसबुद्धी व द्वेषभावना ठेवणे हे राज्यशासनासाठी अशोभनीय होय

**प्रा.बी.टी.देशमुख,**

*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

**१.** नेट-सेट मुक्त शिक्षकांचा प्रश्न फार मोठा संघर्ष करीत आता एका महत्वाच्या वळणावर येऊन ठेपलेला आहे. प्रथम शब्दयुद्धाच्या माध्यमातून सांसदीय पीठासमोर, त्यानंतर आंदोलनाच्या माध्यमातून लोकपीठासमोर, सुनावणी होऊन आता हा प्रश्न न्यायपीठासमोर पोचलेला आहे. लोकशाही व्यवस्थेमध्ये व्यावसायिक संघटनांना आपले प्रश्न या निरनिराळ्या पीठासमोर शक्तीपूर्ण रितीने मांडावे लागतात. या सर्व कामामध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे समर्थ नेतृत्व व विद्यापीठस्तरीय संघटनांचे त्यामध्ये उत्तम योगदान मिळाले त्याच बरोबर हेही लक्षात घेतले पाहिजे की, त्या त्या क्षेत्रावर संघर्ष करतांना **"परिचित क्षेत्रभूमी"** आणि **"त्या क्षेत्रभूमीवरील सराईत वावर"** या दोनही बावी क्षेत्ररक्षणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या असतात. **(अ) विधान मंडळाच्या क्षेत्रभूमीवर** सांसदीय आयुधांच्या माध्यमातून अनेक उपलब्धी आपण मिळवू शकलो. **सर्व उपलब्धीची नोंद करणे स्थलाअभावी शक्य नसले,** तरी '३१ मार्च १९९४ नंतर काढून टाका,' '३१ मार्च १९९५ नंतर काढून टाका,' '३१ मार्च १९९६ नंतर काढून टाका,' 'वार्षिक वेतनवाढी देऊ नका' .... इत्यादी व यासारखे हल्ले त्या क्षेत्रभूमीवर आपल्याला परतवून लावता आले. याचे कारण "परिचित क्षेत्रभूमी" होती हे जसे होते तसेच "सराईत वावर" यामुळे तेथे क्षेत्ररक्षण सोपे होते. **(ब) आंदोलनाची क्षेत्रभूमी** ही आपल्याला अपरिचित नव्हती व आपला वावर सुद्धा त्याठिकाणी नवीन नव्हता. **आंदोलनाच्या मार्गाने मिळालेले सर्व लाभ स्थलाअभावी नोंद करता येणार नाहीत** पण त्यामुळे त्या क्षेत्रभूमीवर "नेट-सेटमुक्त शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगातील कोणतीच वेतनश्रेणी (तळाची सुद्धा) दिली जाणार नाही." ही निर्गमित झालेल्या शासननिर्णयातील व्यवस्था आपल्याला हाणून पाडता आली. हे विसरता येणार नाही.

**२. न्यायपीठाच्या तिसऱ्या क्षेत्रभूमीवर** आपण पोहचलो असतांना या सर्व बाबींचा आढावा घेता असे लक्षात येते की, मा. उच्च न्यायालयाच्या स्तरापर्यंत आपल्याला थोडाफार अनुभव होता. फार सराईत वावर नसला तरी आपल्याला उच्च न्यायालयाचा स्तर हा फारसा नवखाही नव्हता व फार अपरिचित सुद्धा नव्हता. **आज आता हा संघर्ष सर्वोच्च न्यायालयाच्या स्तरावर पोहचलेला असून अपरिचित क्षेत्रभूमी व आपला फारसा वावर नसलेला परिसर अशा स्थितीला सामोरे जाण्याची परिस्थिती आपल्यावर आलेली आहे.** पण, त्यामुळे खचून जाता कामा नये. मा. सर्वोच्च न्यायालयातील संघर्षाला, आदरपूर्वक, धैर्यपूर्वक व हिमतीने सामोरे गेले पाहिजे. **'सत्यमेव जयते'** हे बोधवाक्य असणाऱ्या विधान मंडळाच्या परिसरातून निघालेला हा संघर्ष "सामर्थ्य आहे चळवळीचे ......मात्र संघटनेचे अधिष्ठान पाहिजे" या आंदोलनाच्या क्षेत्रातून **"यतो धर्मस्ततो जयः"** असे बोधवाक्य असलेल्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरात येऊन ठेपलेला आहे. **कायदा व नियम यांना धरून केलेले वर्तन म्हणजे धर्मपालन** असा त्या शब्दाचा अर्थ लावला तर अशा वर्तनाचा जय होतो, असाच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या त्या बोधवाक्याचा अर्थ लावावा लागेल. नेट-सेट संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयातील घडामोडी मुळातून समजून घ्यायच्या तर सन २००८ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगात याबाबत घडलेल्या घडामोडी प्रथम समजून घेतल्या पाहिजेत.

**३. विद्यापीठ अनुदान आयोगातील सन २००८ मधील घडामोडी :-** १८ एप्रिल २००२ रोजी मा. मुंबई उच्च न्यायालयाने सन २००१ च्या याचिका क्रमांक ५७८२ मध्ये "महाराष्ट्रातील नेट-सेट ग्रस्त शिक्षकांच्या बाबतीत **विद्यापीठ अनुदान आयोगाने चार महिन्याच्या आत निर्णय करावा"** असा आदेश पारित केला होता. चार महिन्यात निर्णय झाला नाही. पुढे शेकडो शिक्षकांनी अवमान याचिका दाखल केल्या, तेव्हा विद्यापीठ अनुदान आयोगात एकच खळबळ उडाली. **महाराष्ट्रातील नेट-सेट मुक्त शिक्षकांचा प्रश्न हा एक एक प्रकरण हाताळण्याचा विषय नाही तर त्या ठिकाणी धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल हे विद्यापीठ अनुदान आयोगास समजले, तेव्हा २००८ साल उजाडले होते.**

**३.१** विद्यापीठ अनुदान आयोगाने या कामासाठी नेमलेल्या त्यांच्या स्थायी समितीसमोर हा विषय ठेवला. त्या स्थायी समितीने सर्व कागदपत्रांची छाननी केल्यावर त्या समितीला असे आढळून आले की महाराष्ट्रात नेमणूक झालेले हे सर्व शिक्षक या पदाची विहित पात्रता धारण करीत होते. त्यांची निवडसमितीमार्फत निवड झालेली आहे. त्यांच्या निवडीला मान्यता आहे. त्यामुळे या सर्व नेमणूका बेकायदेशीर आहेत असे म्हणता येणार नाही. **नेट-सेट पात्रता नसतांना सेवेत भरती झालेल्या या शिक्षकांनी पाच वर्षाची सेवा पूर्ण केलेली असेल तर त्यांची सेवा नियमित केली जावी, कारण त्यात काहीही बेकायदेशीर नाही.** अशी भूमिका त्या स्थायी समितीने घेतली.

**३.२** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या त्या स्थायी समितीने दिनांक ३ व ४ सप्टेंबर २००८ च्या सभेमध्ये नेट-सेटग्रस्त शिक्षकांच्या बाबतीत काही धोरणात्मक शिफारसी केल्या. त्यात "With regard to the candidates who had not cleared the NET/SET at the time of selection or appointment and were otherwise found qualified and appointed against existing vacancies on the recommendation of the Selection Committee but were not appointed on a regular basis for lack of NET/SLET clearance and due to non approval from the concerned authorities, the **Committee was of the opinion that if the said appointees have been in continuous service for a period of five years, they will be recommended for exemption from NET/SLET.** The Committee further finds that such appointments at the initial stage were only irregular, in the sense, **that it is not illegal** though the other requirements for regular appointment such as qualifications, selection procedure and existence of vacant posts etc. were duly met and **therefore could be regularized.** The committee feels that their appointment was necessitated due to non availability of NET/SLET qualified candidates and **their five years service is considered to be sufficient for regu-**

**larizing their services.**" अशी एक महत्वपूर्ण शिफारस होती.

**३.३ स्थायी समितीच्या या शिफारसीवर संपूर्ण विद्यापीठ अनुदान आयोगाची बैठक झाली.** पाच वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त सेवा त्या शिक्षकांची झाली असेल तर स्थायी समितीची शिफारस मान्य करावी, असे ठरले. या शिफारसींवर ७ व ८ ऑक्टोबर २००८ रोजीच्या बैठकीत विद्यापीठ अनुदान आयोगाने काही धोरणात्मक निर्णय घेतले. ज्यात एक निर्णय पुढील प्रमाणे आहे :- "The matter was placed before the Commission at its meeting held on 7th & 8th October, 2008. The Commission was of the view that since no NET qualified/NET exempted candidate was available at the time of interview and had **continued service of 5 or more years** the NET /SLET qualification is relaxed in respect of the following candidates for appointment as Lecturer with the following conditions :- **(i)** That the recommended exempted candidate should have been selected by a duly constituted Selection Committee. **(ii)** The constitutional provisions of reservation for SC/ST etc. are followed in these selections."

**३.४** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ७ व ८ ऑक्टोबर २००८ च्या या निर्णयाप्रमाणेच ४ **नोव्हेंबर २००८ चे** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलसचिवांना पत्र (मूळ याचिकेच्या पेपरबुकात पृष्ठ १९ ते २१ वर) रवाना झाले. त्या पत्राला समोर ठेऊनच मा. सर्वोच्च न्यायालयाने १८ नोव्हेंबरची इंटेरिम ऑर्डर केलेली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या स्थायी समितीने "Continuous service for a period of five years" अशी शब्दरचना वापरली होती. विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्णय घेतांना "Continued service of 5 or more years" अशा शब्दांचा वापर केला. तर आता सर्वोच्च न्यायालयाच्या मा. खंडपीठाने आपल्या निर्णयात "Completed six years of service" असे शब्द वापरले आहेत.

**४. एवढी माहिती करून घेतल्यानंतर आता सर्वोच्च न्यायालयातील घडामोडी समजून घेऊ.** मुंबई उच्च न्यायालयाच्या मा. औरंगाबाद खंडपीठाने दि. १ ऑगस्ट २०१३ रोजी सन २०१० च्या याचिका क्रमांक ११४७७ मध्ये नेट-सेट मुक्त शिक्षकांना पदोन्नतीचे (CAS) चे सर्व फायदे देण्यात यावे व थकीत रकमेवर ६ टक्के व्याज देण्यात यावे अशा प्रकारचा निर्णय दिला होता. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात पुनर्निर्णयार्थ अपिल याचिका दाखल करण्यासाठी विशेष परवानगी मागणारा अर्ज (SLP 34118 of 2013) राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केला होता. हा

नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत आता काय स्पष्ट व्हायचे राहीले आहे? सन १९९१ चे नेट-सेटबाबतचे विद्यापीठ अनुदान आयोगाचे रेग्युलेशन हे शिफारसीच्या स्वरुपाचे होते असा मा. सर्वोच्च न्यायालयाचाच निर्णय आहे हे स्पष्ट झालेले आहे, सन १९९१ ते २००० या काळात ते रेग्युलेशन कायदेशीरपणे विधिमय माध्यमाद्वारे महाराष्ट्रात लागू करण्यात आलेले नव्हते हेही स्पष्ट झालेले आहे.

काटेकोरपणे कायद्याच्याच भाषेत बोलायचे झाल्यास विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या पात्रता ह्या मा. राज्यपालांच्या मान्यतेने झालेल्या परिनियमान्वये (Statute) ठरतात. असे परिनियम या काळात महाराष्ट्रामध्ये अस्तित्वातच नव्हते. परिनियमांच्या ऐवजी मा. कुलगूरू निदेश (Direction) निर्गमित करू शकतात. असे निदेशसुद्धा त्या काळात निर्गमित झालेले नव्हते, सबंध राज्यामध्ये एकवाक्यता असावी म्हणून प्रमाणसंहिता (Standard Code) हे माध्यम राज्य शासनाला उपलब्ध होते पण तेही निर्गमित करण्यात आलेले नव्हते, ह्या गोष्टी आता मा. न्यायालयातील घडामोडीमुळे स्पष्ट झालेल्या आहेत,

शासन निर्णयाने विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या भरतीसाठीची पात्रता ठरविली जात नाही. तथापि तसा शासननिर्णय सुद्धा त्या काळात अस्तित्वात नव्हता ही गोष्ट सुद्धा आता स्पष्ट झालेली आहे. खुद्द राज्यशासनाने "सप्टेंबर १९९१ पासून ते पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येत नाही" हे २७ जून २०१३ रोजी शासननिर्णय काढून मान्य केले आहे, २३ ऑक्टोबर १९९२ ला आम्ही शासन निर्णय काढला अशी भूमिका राज्यशासनाने घेतली, तो शासननिर्णय पुढच्या ३५ दिवसामध्ये मृत्यूमुखी पडला ही गोष्ट महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने महाराष्ट्र शासनाच्या लक्षात आणून दिल्यावर राज्यशासनाची एवढी फजिती झाली की २३ ऑक्टोबर १९९२ च्या शासननिर्णयाचा साधा उल्लेखसुद्धा मा. सर्वोच्च न्यायालयात करण्याचा शासनाच्या वकिलांना संकोच वाटू लागला आहे.

एकामागून एक मा.उच्च न्यायालयाच्या सात खंडपीठांचे निर्णय विरोधात गेल्यावर तरी निदान राज्य शासनाची आकसबुद्धी संपुष्टात येईल असे या शिक्षकांना वाटत होते. पण शिक्षकांच्या विषयी कमालीची द्वेषभावना मनात धरुन असलेल्या अधिकाऱ्यांनी राज्यशासनाला वेठीस धरले असून मा. सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा त्यांनी निर्णय घेतला व या १० हजार प्राध्यापकांना सर्वोच्च न्यायालयात दाखल व्हावे लागत आहे. देशाच्या घटनेने सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा शासनाचा अधिकार कोणीही अमान्य करू शकत नाही. त्यांच्या या अधिकाराचा आम्ही आदर करतो. मात्र त्या निर्णयातून प्रदर्शित होणारी शिक्षकांविषयीची कमालीची द्वेषभावना ही राज्यशासनासाठी निश्चितच अशोभनीय आहे असेच कोणीही म्हणेल. या शिक्षकांनी, त्यांच्या संघटनांनी व शिखरस्थ महासंघाने मा. सर्वोच्च न्यायालयातील या संघर्षाला आदरपूर्वक, धैर्यपूर्वक व हिमतीने सामोरे जाण्याचा निर्णय घेतला आहे.

# RECOMMENDATORY

The provisions of clause 2 of the said Regulations are, therefore, recommendatory in character.

- SUPREME COURT

*(परिच्छेद ९ पहा)*

अर्ज दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसाठी आला. मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये याबाबतची सुनावणी होत असतांना उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेल्या कागदपत्राच्या व वस्तुस्थितीच्या आधारावरच विशेष परवानगीसाठीच्या अर्जाचे समर्थन किंवा त्याला विरोध करता येतो. समर्थकांना किंवा विरोधकांना उच्च न्यायालयामध्ये न ठेवलेली कागदपत्रे, तथ्ये किंवा वस्तुस्थिती नव्याने त्या ठिकाणी मांडता येत नाही, हे लक्षात घेऊनच मा.सर्वोच्च न्यायालयात घडलेल्या घडामोडी विचारात घेतल्या पाहिजेत.

**४.१** मा. उच्च न्यायालयामध्ये याचिकाकर्त्यांनी जी याचिका सादर केली होती ती याचिका मा. सर्वोच्च न्यायालयासमोर होती. त्या याचिकेमध्ये परिच्छेद ३ पुढील प्रमाणे आहे. :- "(3) The petitioners state that, in pursuance to one judgment given by this Honourable court individual proposals for exemption from NET/ SET qualification were Forwarded to U.G.C. by each management through the university concerned. The petitioners state that the proposal of petitioners were forwarded for exemption from NET/SET through respondent no. 4 university to U.G.C. and U.G.C granted exemption vide letter dt. 4.11.2008 **The petitioners are annexing herewith the copy of letters dated 4/11/ 2008 issued by U.G.C. at EXHT.B.** for the purpose of ready reference."

**४.२** याचिकाकर्त्यांनी **एक्झीबीट बी** म्हणून आपल्या याचिकेसोबत जोडलेले होते ते सहपत्र म्हणजे विद्यापीठ अनुदान **आयोगाने दि. ४ नोव्हेंबर २००८ रोजी** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादच्या मा. कुलसचिवांना पाठविलेले पत्र होते. त्या पत्रातील पहिला परिच्छेद पुढील प्रमाणे आहे. :-"With reference to the proposal on the above subject, I am directed to inform you that the matter was placed before the Commission at its meeting held on 7th & 8th October, 2008. The Commission was of the view that since no NET qualified/NET exempted candidate was available at the time of interview and had continued service of 5 or more years the NET/SLET qualification is relaxed in respect of the following candidates for appointment as Lecturer with the following conditions :- **(i)** That the recommended exempted candidate should have been selected by a duly constituted Selection Committee. **(ii)** The constitutional provisions of reservation for SC/ST etc. are followed in these selections." व खाली त्या पत्रात २१ शिक्षकांना नेट-सेट मुक्तता दिल्याचे नमूद आहे. ४ नोव्हेंबर २००८ चे हे पत्र सोबत (पृष्ठ २४६ वर) प्रकाशित केले आहे.

**४.३** याचिकाकर्त्यांची कागदपत्रे व प्रतिवादींची कागदपत्रे नजरेखालून घातल्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालयाने (अ) विशेष परवानगीचा अर्ज (ब) अंतरिम व्यवस्थे (Interim Order) बाबतचा निर्णय व (क) स्थगनादेश या तीनही बाबतीत आदेश पारित केले. ते क्रमशः पाहू.

**(अ) विशेष परवानगी** :- मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये मा. उच्च न्यायालयाच्या निकालावर अपील दाखल करण्यासाठी विशेष परवानगी मागणारा राज्यशासनाचा अर्ज मान्य करण्यात आला तो पुढील शब्दात :- "Permission to file SLP is granted."

**(ब) अंतरिम व्यवस्था (Interim Order)** :- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ४ नोव्हेंबर २००८ च्या पत्रान्वये नेट-सेट पात्रता नसलेल्या ज्या शिक्षकांची सेवा ६ वर्षे झालेली आहे, त्यांना पदोन्नतीचे (CAS) लाभ देण्यात येऊन त्यांची वेतन निश्चिती करण्यात यावी. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पत्रामध्ये "Service of Five Or More Years" अशी शब्दरचना होती. त्याऐवजी मा. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात सोपी व बिनगुंतागुंतीची सरळ सरळ "Six Years of Service" अशी शब्दरचना वापरली आहे. हा अंतरिम व्यवस्थेबाबतचा आदेश मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात परिच्छेद ४ मध्ये नमूद असून तो शब्दशः पुढील प्रमाणे :- "4. We are of the view that following the **UGC Notification/Letter dated 4.11.2008, those teachers who have not passed NET/SET examination but who have completed six years of service as on that date should be entitled to the benefits of career advancement scheme** only for the purpose of pay-scales. According to us such an interim order for that limited purpose will meet ends of justice."

**(क) स्थगनादेश** :- आम्ही वर जे आदेश दिलेले आहेत, त्या आदेशाच्या अधीन राहून कारवाई करण्यात यावी व तोपर्यंतच्या काळात मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती राहील. असेही मा. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशाच्या परिच्छेद ५ मध्ये नमूद केलेले आहे. ते पुढील शब्दात :- "5. The impugned orders passed by the High Court will remain stayed subject to the order as above."

**५.** त्यानंतर दिनांक २५ नोव्हेंबर २०१३ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या त्याच खंडपीठासमोर बरेच युक्तीवाद उभय पक्षांनी केले. मात्र मा. खंडपीठाने आपला १८ नोव्हेंबरचा निर्णय कायम ठेवला. त्या दिवशीच्या सुनावणीनंतर मा. खंडपीठाने पुढील प्रमाणे आदेश पारित केले. :- "Heard the learned counsel for the parties......Inasmuch as leave is already granted, the matter to come up in its own course." पुन्हा दिनांक २७ नोव्हेंबर २०१३ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या त्याच खंडपीठासमोर हे प्रकरण बोर्डावर नसतांना राज्यशासनाच्या वकिलाने केलेल्या विनंतीवरून ते

# MANDATORY

UGC's Regulations 1991 on minimum qualification are mandatory in nature.

- UGC

*(परिच्छेद ९.१ पहा)*

# यतो धर्मस्ततो जयः

*कायदा व नियम यांना धरून केलेले वर्तन म्हणजे धर्मपालन असा त्या शब्दाचा अर्थ लावला तर अशा वर्तनाचा जय होतो, असाच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या त्या बोधवाक्याचा अर्थ लावावा लागेल.*

*(परिच्छेद २ पहा)*

प्रकरण बोर्डावर घेण्यात आले. त्या दिवशी मा खंडपीठाने १८ नोव्हेंबर २०१३ च्या आपल्या आदेशात एक ओळ जास्तीची जोडण्यात यावी, ही विनंती मान्य केली. त्या दिवशीच्या कामकाजाचा अधिकृत वृत्तांत पुढील प्रमाणे :- "Taken on Board. The matter was mentioned by Mr. Marlapalle, learned senior counsel for the petitioner(s). Mr. Prabhakar, counsel is present on behalf of Mr. Anumolu, AOR, counsel for the respondent(s). The following line be added in the Order passed by us on 18.11.2013:-

"The above Order will be subject to the final orders to be passed in these appeals".

दिनांक १८, दिनांक २५ व दिनांक २७ नोव्हेंबर २०१३ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयात झालेल्या कार्यवाहीचे तपशील व आदेश याच अंकात अनुक्रमे पृष्ठ २४३, २४४ व २४५ वर प्रकाशित केलेले आहेत.

६. **"सर्वोच्च न्यायालयामध्ये अपिलार्थ परवानगी मागणारा शासनाचा अर्ज व त्याबाबत करावयाची उपाययोजना"** या विषयाबाबत शिक्षकांनी व संघटनांनी काही महत्वपूर्ण निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. **(एक)** मा. उच्च न्यायालयाच्या एकाच पहिल्या निकालाबाबत ही परवानगी असेल तर त्यानंतर लागलेले इतर निकाल त्या सुनावणीमध्ये दाखल करता येतील किंवा कसे? **(दोन)** मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठासमोर दाखल असलेल्या सर्व प्रकरणांची सर्वोच्च न्यायालयात एकत्र सुनावणीकरीता परवानगी द्यावी अशी विनंती करता येते काय? करता येत असेल तर करावी किंवा कसे? **(तीन)** मा. सर्वोच्च न्यायालयात होऊ घातलेल्या सुनावणीमध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या सर्व खंडपीठासमोरील प्रलंबित असलेल्या प्रकरणातील संघटना व व्यक्तिंना सहभागी करून घेता येईल काय? **(चार)** मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या सर्व खंडपीठासमोर प्रलंबित असलेल्या सर्व प्रकरणांचा पुढील एक महिन्यात निर्णय करण्यासंबधी विनंती सर्वोच्च न्यायालयाला करता येते काय? करता येत असेल तर करावी किंवा कसे? **(पाच)** व त्यानंतरच मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये एकत्र सुनावणी व्हावी अशी विनंती करावी किंवा कसे? **(सहा)** सर्वच प्रलंबित प्रकरणे एका खंडपीठापुढे किंवा मा. सर्वोच्च न्यायालयापुढे बोलावून त्याबाबत एकत्र सुनावणी करता येते किंवा कसे? येत असल्यास त्याबाबत विनंती करावी किंवा कसे? **(सात)** या सर्वच प्रश्नाबाबत चर्चा करून या सर्व प्रकरणाबाबत यापेक्षा वेगळा काही मार्ग निवडावा किंवा कसे? **(आठ)** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयातील कारवाईमध्ये सहभागी (Intervention) होता येते काय? या व यासंबंधात इतर सर्वच प्रश्नांबाबत सर्व स्तरावरचे संघटनांचे पदाधिकारी परस्परांशी संपर्कात असून यथासमय बैठकी होऊन यथायोग्य निर्णय घेतले जात आहेत. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने याकामी नेमलेली एक उच्चस्तरीय समिती या सर्व घडामोडीवर बारकाईने लक्ष ठेऊन आहे. **उपरोक्त सर्व मुद्यांचा तपशीलवार विचार करून या समितीने सर्वोच्च न्यायालयात सहभागीत्वाचा अर्ज (Intervention Application) करण्याचा निर्णय घेतलेला आहे.**

७. मुंबई उच्च न्यायालयाच्या मा. औरंगाबाद खंडपीठाने २०५ प्राध्यापकांच्या प्रकरणी दिनांक १७ ऑक्टोबर २०१३ रोजी सन २०१० च्या याचिका क्रमांक १०१४९ मध्ये निर्णय दिलेला आहे. त्या याचिकेमध्ये समाविष्ट असलेल्या २०५ नेट-सेट मुक्त प्राध्यापकांच्या बाबतीत २३ फेब्रुवारी २०१० च्या बैठकीत विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट-सेट मुक्तीचा निर्णय घेतला होता पण नंतर मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या ३० मार्च २०१० च्या आदेशाचे निमित्त पुढे करून मुळातील देण्यात आलेली नेट-सेट मुक्तता रद्द करण्याचा आयोगाने निर्णय घेतला. त्यामुळे या २०५ प्राध्यापकांनी न्यायालयात धाव घेतली.

७.२ सन १९९१ ते २००० या कालखंडात महाराष्ट्रामध्ये विधिवतरित्या सेवेत आलेल्या बिगरनेट-सेट प्राध्यापकांच्या बाबतीत काही प्राध्यापकांना नेट-सेटमुक्तता प्रदान करावयाची व ३० मार्च २०१० च्या केंद्र शासनाच्या आदेशांचे निमित्त करून इतरांच्या बाबतीत निर्णय घ्यायचा नाही, अशा वर्तणुकीमुळे **समान स्थितीत असलेल्या प्राध्यापकांमध्ये अत्यंत तिरस्कार उत्पन्न करणाऱ्या भेदभावपूर्ण वागणूकीला जन्म देणारा लहरी व छांदिष्ट निर्णय घेऊन वंचित प्राध्यापकांचा अवसानघात करता येणार नाही** असा हा स्पष्ट निर्णय मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिला आहे. मा. न्यायालयाच्या निर्णयातील परिच्छेद २९ मधील मुळ शब्दरचना पुढील प्रमाणे आहे. :- " In view of this and having regard to the earlier decisions of this court and particularly the subsequent resolution by UGC after 30-03-2010 as referred to above, keeping away the petitioners cases from being considered for the benefit of exemption with reference to the directions of the HRD Ministry would give rise to **invidious discrimination** among similarly situated persons under the **capricious decisions** leaving the petitioners **in lurch.**"

७.३ आम्ही या निर्णयात नमूद केल्याप्रमाणे पुढील चार महिन्याच्या आत हा भेदभाव संपुष्टात आणणारी (नेटसेट मुक्तीची) कृती सर्व संबंधितांनी पार पाडावी व या शिक्षकांना सर्व अनुषंगिक व तद्जन्य लाभ उपलब्ध करून द्यावेत (३० मार्च २०१० च्या केंद्र शासनाच्या आदेशात अडकून न पडता) असे आदेश मा. उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ३१ मध्ये पुढील शब्दात दिलेले आहेत. "We, therefore, direct the concerned authorities to consider petitioners cases for grant of exemption from passing NET/SLET with reference to observations hereinabove and give them consequential and incidental benefits. We expect that such exercise would be done expeditiously, preferably within a period of four months without being trammeled by decision / direction dated 30-03-2010 of HRD Ministry." **या निर्णयामुळे या २०५ शिक्षकांच्या निमित्ताने हे प्रकरण पुन्हा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दरबारात पोचले आहे व त्याबाबत त्या आयोगाने चार महिन्यात निर्णय घ्यावयाचा आहे.**

८. आता हे प्रकरण पुन्हा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दरबारात गेलेलेच आहे तर या प्रकरणातील विद्यापीठ अनुदान आयोगाच्या एकूण भूमिकेची छाननी करणे आवश्यक झालेले आहे. याबाबत सर्वात महत्वाचा प्रश्न असा आहे की, विद्यापीठ अनुदान आयोगाने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या स्पष्ट निर्णयानंतर ही हजारो प्रकरणे आपल्याकडे घेतलीतच कशी?

**८.१ पुढच्या बारा महिन्यातील नेट-सेटची प्रकरणे पाठवा असे मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सांगितले तर विद्यापीठ अनुदान आयोगाने गेल्या अनेक वर्षातील प्रकरणे मागविली.** मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने २००१ च्या याचिका क्रमांक ५०२२ मध्ये दिनांक २० फेब्रुवारी २००२ रोजी दिलेल्या निकालात स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की :- "We also hold that the cases of candidates appointed from 12th October, 1999 till 18th October, 2000 are required to be examined so as to ascertain the

applicability of the first proviso to clause 2 of the 1991 Regulations as well as 2000 Regulations before their services are sought to be terminated by the respective universities and/ or colleges/ institutions." याचा अर्थ "१२ ऑक्टोबर १९९९ ते १८ ऑक्टोबर २००० या काळातील प्रकरणांची छाननी करावी" असा हा निर्णय आहे.

**८.२** मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने १०४ प्रकरणे पाठवा असे सांगितले तर विद्यापीठ अनुदान आयोगाने हजारो प्रकरणे मागविली. मा. मुंबई उच्च न्यायालयाने २००१ च्या याचिका क्रमांक ५७८२मध्ये दिनांक १४ एप्रिल २००२ रोजी दिलेल्या निकालात स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की :- "In the event the UGC takes decision adverse to the interests of teachers the management and the University are directed not to act upon it for a period of four weeks from the date of communication by UGC to the college through the University. In the result the petitions mentioned in the **SCHEDULE** to this order are disposed of by this order..... Except those petitions mentioned to be heard separately, rest of the petitions mentioned in the **SCHEDULE** are covered by this order and are accordingly disposed." या निर्णयात शेवटी **परिशिष्ट** देण्यात आले असून त्या **परिशिष्टात दिलेल्या १०४** (अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील नेट-सेटमुक्त शिक्षकांची ३० प्रकरणे या परिशिष्टातील १०४ मध्ये समाविष्ट होती.) प्रकरणांची छाननी करून विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्णय द्यावा असे नमूद असतांना त्या निकालाचे निमित्त करून हजारो प्रकरणे बॅगा भरभरून दिल्लीत मागविली गेलीत.

**९.** मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ८ सप्टेंबर १९९४ रोजी "University of Delhi, Appellant v/s Raj Singh and others, Respondents. A.M. AHMADI AND S.P. BHARUCHA, JJ. : AIR 1995 SUPREME COURT 336." या प्रकरणात दिलेल्या निर्णयाप्रमाणे **:-**

"Regulations (1991), notified on 19th September, 1991, by the University Grants Commission are valid.....The provisions of clause 2 of the said Regulations are, therefore, **recommendatory in character.** ..... and the **application prospective** The second proviso to clause 2 makes the application of the said Regulations prospective." (परिच्छेद २१) याचा सरळ अर्थ असा की, UGC's 1991 regulation regarding NET/SET is **recommendatory in nature.** The decision whether to make it mandatory or not is to be taken by the concerned university or the state Govt. Such decision if taken shall be implemented only after making and issuing necessary statute or standard code. Supreme court has also made it clear that this regulation shall come into force **prospectively** and not retrospectively and this regulation relates to all **applicants** i.e. candidates.

" The University autonomy is not entreched upon by the said regulation" (Para 21) असे मा. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात नमूद केलेले आहे.

**९.१** सन १९९१ च्या रेग्युलेशनबाबत हा कायद्याच्या क्षेत्रातील अंतिम शब्द असतांना आता विद्यापीठ अनुदान आयोगाने मा. उच्च न्यायालयासमोर शपथपत्र दाखल केले. त्यात "UGC's Regulations 1991 on minimum qualification are **MANDATORY** in nature. " असे म्हणणे मांडले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने मा. औरंगाबाद खंडपीठासमोर सन २०१० च्या याचिका क्रमांक १०१४९ मध्ये दिनांक ११ एप्रिल २०११ रोजी एक ३६ परिच्छेदाचे शपथपत्र दाखल केले असून त्याच्या परिच्छेद १२ मध्ये उपरोक्त विधान केलेले आहे. हे विधान मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या संपूर्णपणे विरोधात असून **मा. सर्वोच्च न्यायालयाचा अधिक्षेप व अवमान करणारे आहे. असत्य विधान करणारे प्रतिज्ञापत्र दाखल केल्याने उच्च न्यायालयाचा अवमान केल्याची कृतीसुद्धा आयोगाच्या हातून घडलेली आहे.**

**१०.** मा. मुंबई उच्च न्यायालयाने २००१ च्या याचिका क्रमांक ५७८२मध्ये दिनांक १४ एप्रिल २००२ रोजी दिलेल्या निर्णयात विद्यापीठ अनुदान आयोगाला पुढील प्रमाणे आदेश देण्यात आलेले होते :- "The managements where they are directed to approach the UGC for relaxation shall do so within **four months** from the date of the order of this court. The concerned University then process the same and forward them to UGC. This be done by the concerned Universities within **four months** of receiving the requests from the managements. **The UGC will have then four months** time to process the applications and request so made and then take decision." चार महिन्याच्या आत निर्णय घेण्याचे मा. उच्च न्यायालयाचे आदेश असतांना विद्यापीठ अनुदान आयोगाने तब्बल ९ वर्षे या कामासाठी लावलीत. **त्यातही म्हणजे पहिल्या ४-५ वर्षात आयोग सतत असे सांगत होते की एक एक प्रकरण वेगवेगळे पाठवा, एकत्र पाठवू नका. असे एक एक प्रकरण तपासून निर्णय घेण्याची आयोगाला एवढी गोडी लागली की, महाराष्ट्रातील हे एकूणच प्रकरण एकएक प्रकरण वेगवेगळे तपासण्याचे नसून धोरणात्मक निर्णय घेण्याचे आहे हे कळण्यास आयोगाला २००८ साल उजाडले** व निर्णय घेण्यास २०११ साल. मार्गभ्रष्ट झालेल्या आयोगाने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात मा. उच्च न्यायालयात हे शपथपत्र दाखल करून आपल्या बेकायदेशीर वर्तनाची परमसीमा गाठली.

**११.** मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आम्हाला ठाऊक नव्हता अशी भूमिका विद्यापीठ अनुदान आयोग घेऊ शकत नाही कारण सर्वोच्च न्यायालयामध्ये खुद्द विद्यापीठ अनुदान आयोग या प्रकरणात प्रतिवादी या नात्याने उभे होते व देशाच्या अटर्नी जनरलनी विद्यापीठ अनुदान आयोगाची बाजू मा. खंडपीठासमोर जोरदारपणे मांडली होती.

**११.१** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने दिनांक ३० मार्च २००३ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाला एक तपशीलवार निवेदन (मेमोरंडम) पाठवून सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय लक्षात आणून दिला होता. त्या निवेदनातील परिच्छेद ४.१ पुढील प्रमाणे :- "In the University of Delhi V/s Raj Singh and Others, the Hon'ble Supreme Court (AIR 1995, SC, 336) while dealing with the UGC Notification dated 19th September 1991 ruled that **(i) Regulations are valid; (ii) They are recommendatory in character; and (iii) the application of the provisions was prospective.**"

**११.२** महासंघाच्या त्याच निवेदनाच्या परिच्छेद ५.४ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाला पुढील प्रमाणे विनंती करण्यात आली होती. "Immediately issue direction to all Non Agricultural Universities in Maharashtra that in respect of Lecturers appointed prior to the cut off date, viz. 30th December 1999, NET/SET qualification condition is not applicable"

**१२.** विद्यापीठ अनुदान आयोगाला ३० मार्च २००३ रोजी महासंघाच्या वतीने सादर करण्यात आलेल्या या तपशीलवार निवेदनामधील परिच्छेद

**राष्ट्रीयस्तरावरील हिमालयाएवढी चूक दुरुस्त करण्याची विद्यापीठ अनुदान आयोगाला शेवटची संधी**

*(परिच्छेद २०.१ व २०.४ पहा)*

५.६ पुढील प्रमाणे होता. :- "5.6 The MFUCTO desires that the UGC provide an opportunity to the MFUCTO to explain in person the various aspects of this human problem in the form of improper treatment of NET/SET qualification conditions in the State of Maharashtra. The **MFUCTO deputation would wait on the Chairman of the UGC on any appointed day and time at New Delhi** so that the complicated issues involved in this vexed problem will stand settled once and for all and injustice would stand removed. It is towards this end that the MFUCTO is submitting this Memorandum **and is seeking immediate appointment for discussion.**" दुर्दैवाने गेल्या १० वर्षात विद्यापीठ अनुदान आयोगाने महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला चर्चेसाठी वेळ दिली नाही. महासंघाचे म्हणणे ऐकून घेतले नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविषयी चुकीची माहिती पुरविण्याचा आपला उद्योग अव्याहतपणे सुरू ठेवला.

**१३.** नागपूर विद्यापीठाच्या मा. कुलसचिवांनी विद्यापीठ अनुदान आयोगाचे १९९१ चे रेग्युलेशन हे शिफारशींच्या स्वरूपाचे आहे हे त्या आयोगाला स्पष्टपणे कळविले होते. नागपूर विद्यापीठाच्या मा. कुलसचिवांनी विद्यापीठ अनुदान आयोगाला दिनांक १७ डिसेंबर २००२ रोजी पाठविलेल्या तपशीलवार निवेदनातील परिच्छेद ७ पुढील प्रमाणे आहे. :- "The University Grants Commission (Qualifications required of a person to be appointed to the teaching staff of a University and institutions affiliated to it) Regulations 1991 as notified on 19th September, 1991 by the University Grants Commission, were analysed by SUPREME COURT in Civil Appeal No. 1819 of 1994, decided on 8.9.1994, in University of Delhi, Appellant V/S Raj Singh and others, Respondents. (A.M. AHMADI AND S.P. BHARUCHA,): AIR 1995 SUPREME COURT 336) It was ruled by the Appex Court as follows: (i) Regulations are valid **:** Regulations (1991), notified on 19th September, 1991, by the University Grants Commission are valid. **(ii) recommendatory :** The provisions of clause 2 of the said Regulations are, therefore, recommendatory in character. **(iii) Application prospective :** The Second proviso to clause 2 makes the application of the said Regulations prospective. "

**१४.** अमरावती विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू मा. डॉ. एस.एन.पाटील यांनी १० डिसेंबर २००२ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांना एक तपशीलवार निवेदन (यापुढे उल्लेख अमरावती विद्यापीठाचे निवेदन असा) पाठवून १९९१ ते १९९९ या काळातील मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयात नमूद असलेली ३० शिक्षकांची प्रकरणे विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविली होती व त्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाला आपल्या निवेदनाच्या परिच्छेद १२ मध्ये स्पष्टपणे असे कळविले होते की, :-

"(12) REQUEST IN RESPECT OF (A) Cases covered by Second proviso of para 2 of UGC Regulation 2000 :-

Every teacher (approved by this university) mentioned (at Sr.No. 1 to 30) in column No. 2 of the Appendix-A working as a lecturer in the college mentioned in column No. 3, was duly selected by a duly constituted selection committee on a date mentioned in column No. 6 of Appendix-A, and was having the then requisite minimum qualification (mentioned in column No. 4 of Appendix-A) as were existing at that time. (NET/SET was prescribed as a compulsory qualification at the recruitment level in this university for the first time by Direction No. 7 of 1999, dated 27.12.1999 (Please refer enclosure No. **7**) published in the Amravati University Gazette on 30.12.1999 on page No. 97) As per the judgement delivered by the Supreme Court of India referred at 2 above, U.G.C. Regulation 1991 regarding NET/SET can be implemented prospectively. In supersession of all previous notifications, U.G.C. issued "UGC Regulation 2000" notification.

**१४.१** अमरावती विद्यापीठाच्या निवेदनाच्या याच परिच्छेदात डॉ. पाटील यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांना असेही कळविले होते की, :- "Every teacher mentioned in **Appendix-A** is covered by second proviso of Para 2 of the 2000 Regulation. It is the considered view of this university that NET/SET qualification is not applicable to the teachers mentioned in the **Appendix-A** as they are covered by second proviso of para 2 of the UGC regulation 2000 and protected by the Supreme Court judgement referred at 2 above. U.G.C. may kindly confirm this view of the university "

**१४.२** अमरावती विद्यापीठाच्या याच निवेदनाच्या परिच्छेद ७ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाचे १९९१ चे रेग्युलेशन हे रिकमेंडटरी असल्याचे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात आणून देण्यात आले होते.

**१४.३** अमरावती विद्यापीठाच्या याच निवेदनाच्या परिच्छेद ३ मध्ये मा. कुलगुरूंनी विद्यापीठ अनुदान आयोगाने लावलेली नेट-सेट पात्रतेची अट इकडे कायद्याने ३०.१२.१९९९ पर्यंत कधीही सक्तीची करण्यात आलेली नव्हती. त्याबाबत मा. कुलपतींच्या संमतीने तयार करण्यात आलेले परिनियम ११ जानेवारी २००१ पासून या विद्यापीठात अस्तित्वात आले व नेट-सेटची पात्रता सक्तीची म्हणून त्या तारखेपासून लागू झाली. ही गोष्ट पुढील शब्दात आयोगाच्या लक्षात आणून दिली होती. :- "It is submitted that for the first time NET/SET was introduced (on 30.12.1999) as a necessary requirement at the recruitment level as per University Grants Commission Regulation in Amravati University. This Direction lateron was converted into Statute No. 2 of 2001 (Please refer enclosure No. **9**) which was assented by Hon ble Chancellor vide his office letter No. CS/AU/STT/43/00/A/(3727)/98 dt. 11th Jan., 2001."

**१४.४** १९९१ ते १९९९ च्या कालखंडातील शेकडो प्रकरणे विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविण्यास अमरावती विद्यापीठाच्या मा. कुलगुरूंनी स्पष्टपणे नकार दिला होता व मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयात नमूद असलेल्या फक्त ३० शिक्षकांची प्रकरणे मात्र आयोगाकडे पाठविली होती व

**मा. सर्वोच्च न्यायालयातील संघर्षाला, आदरपूर्वक, धैर्यपूर्वक व हिमतीने सामोरे गेले पाहिजे**

*(परिच्छेद २ पहा)*

त्यांना नेट-सेट पात्रता लागू नव्हती असेही कळविले होते.

**१४.५** अमरावती विद्यापीठाने सतत "**तुमचे १९९१ चे रेग्युलेशन शिफारशीच्या स्वरूपाचे आहे.**" ही गोष्ट विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात आणून दिली. पण मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा चुकीचा अर्थ सांगण्याचा हेका आयोगाने सुरुच ठेवला. अमरावती विद्यापीठाच्या कुलसचिवांना दिनांक २४.१०. २००३ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या एका अधिकाऱ्यांने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे युजीसी रेग्युलेशन हे बंधनकारक असल्याचे पुढील शब्दात कळविले होते.:- "The UGC's Regulations on minimum qualifications **are mandatory** in nature, which has been upheld by the **Supreme Court** also. Every University has to strictly comply with the Regulations"

**१४.६** अमरावती विद्यापीठाच्या कुलसचिवांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे दिनांक २१ जानेवारी २००४ च्या (१३.१२.२००४ च्या ) पत्रान्वये ज्यावेळी पुन्हा याबाबत "So kindly convey us details of the Supreme Court case referred in UGC letter dated 24th Oct, 2003." या शब्दात विचारणा केली. तेव्हा ३०.१२.२००४ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने "Regarding details of the Supreme Court case referred UGC letter dated 24.10.2003." या विषयावर एक पत्र पाठवून पुढील प्रमाणे कळविले. :- "With reference to your letter No. F./AU/8/10/C-3044/2004 dated 13.12.2004, I am directed to enclose a copy of the judgment civil appeal No. 1819 of 1994 Delhi University Vs Raj singh & Others" सिव्हील अपील नं. १८१९/१९९४ दिल्ली विद्यापीठ विरुद्ध राजसिंग या खटल्यातील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दाखला दिला व त्या निर्णयाची प्रत सोबत पाठविली व पुन्हा नेट-सेट रेग्युलेशन सक्तीचे असल्याचा दावा केला. हा खुलासा संपूर्णपणे असत्य होता.

**१४.७** पुन्हा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या एका अवर सचिवांनी अमरावती विद्यापीठाला २७.१२.२००५ रोजी एक पत्र लिहून सन १९९१ चे रेग्युलेशन हे मॅंडेटरी असल्याचे पुढील शब्दात कळविले. :- "Since 19th September, 1991, NET-SET is one of the compulsory requirement for appointment to the post of Lecturer. The regulations on minimum qualifications issued by the UGC are mandatory in nature and all the universities are advised to strictly comply with them."

**१४.८** अमरावती विद्यापीठाने सातत्याने विद्यापीठ अनुदान आयोगाला सन १९९१ चे रेग्युलेशन हे शिफारशीच्या स्वरूपाचे आहे ही गोष्ट वारंवार कळविली. मा. कुलगुरूंचे १० मार्च २००३ चे पत्र व त्यानंतर कुलसचिवांनी पाठविलेले २५ जाने २००४, २५ फेब्रुवारी २००५, २९ जुन २००५ आणि ३ जुलै २००९ या पत्रांनी ही गोष्ट वारंवार कळविली.

**१४.९** शेवटी सातत्याने विद्यापीठ अनुदान आयोगाने अमरावती विद्यापीठाशी पत्रव्यवहार करतांना १९९१ चे रेग्युलेशन हे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे सक्तीचे असल्याचा असत्य व चुकीचा दावा सतत चालू ठेवल्यामुळे **विद्यापीठाने १९९१ ते १९९९ या काळातील ८०० च्या वर प्रकरणे विद्यापीठ अनुदान आयोगाकडे दिनांक ३ जुलै २००९ रोजीच्या पत्रान्वये पाठविली. पण तसे करतांना सन २००० च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नेट-**

ITEM NOS.21 & 68 : **COURT NO.11** : SECTION IX

# SUPREME COURT OF INDIA

**RECORD OF PROCEEDINGS**

Petition(s) for Special Leave to Appeal (Civil) No(s).34118/2013

(From the judgement and order dated 01/08/2013 in WP No.11477/2010 of the HIGH COURT OF BOMBAY AT AURANGABAD)

STATE OF MAHARASHTRA & ORS. : Petitioner(s) ***VERSUS*** ASHA RAMDAS BIDKAR & ORS.: Respondent(s)
(With appln(s) for exemption from filing O.T., permission to file synopsis and list of dates and with prayer for interim relief)
**WITH** S.L.P.(C) No......CC 20259/2013 (With application for permission to file SLP and office report)

## Date:18/11/2013

These Petitions were called on for hearing today.

**CORAM :**
**HON'BLE MR. JUSTICE H.L. GOKHALE : HON'BLE MR. JUSTICE J. CHELAMESWAR**

**FOR PETITIONER(S) :** Mr. B.H. Marlapalle,Sr.Adv., Ms. Asha Gopalan Nair,Adv. **FOR RESPONDENT(S) :** Mr. Pradeep G. Deshmukh,Adv., Mr. J.N. Singh,Adv., Mr. Venkateswara Rao Anumolu,Adv., * Mr. Vinay Navare,Adv., Mr. Satyajeet Kumar,Adv., Mr. Keshav Ranjan,Adv. for Ms. Abha R. Sharma,Adv.

**UPON hearing counsel the Court made the following**

## O R D E R

Permission to file SLP is granted.

2. Heard Mr. Marlapalle, learned senior counsel in support of SLP(C) No.34118/2013 and Mr. Vinay Navare, learned counsel in support of SLP(C) No....CC 20259/2013. Mr. Pradeep Deshmukh appears for the contesting respondents in both these matters.

3. Having heard the counsel for the parties, in our view the matters require consideration. Hence, leave granted in both these matters. Liberty to file additional documents.

4. We are of the view that following the UGC Notification/Letter dated 4.11.2008, those teachers who have not passed NET/SET examination but who have completed six years of service as on that date should be entitled to the benefits of career advancement scheme only for the purpose of pay-scales. According to us such an interim order for that limited purpose will meet ends of justice.

5. The impugned orders passed by the High Court will remain stayed subject to the order as above.

(A.S. BISHT)
COURT MASTER

(SNEH LATA SHARMA)
COURT MASTER

परिच्छेद ४.३ पहा ** AF : P 213 **

**सेटबाबतच्या रेग्युलेशनच्या पहिल्या परंतुकामध्ये ही प्रकरणे नेट-सेट मुक्ततेसाठी येत नसून ती दुसऱ्या परंतुकाप्रमाणे नेट-सेट मुक्त आहेत याची विद्यापीठ अनुदान आयोगाला स्पष्ट जाणीव करून देण्यात आली होती.** या विद्यापीठाची कायदेशीर बाजू व मांडणी एवढी मजबूत होती की ३ जुलै २००९ च्या पत्रान्वये ८०० च्या वर शिक्षकांची ही जी प्रकरणे आयोगाकडे पाठविण्यात आली त्या सर्वांना लगोलगच विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट-सेटमुक्तता घोषित केली.

**१५.** मा. सर्वोच्च न्यायालयाने सन १९९१ च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नेट-सेट बाबतच्या रेग्युलेशनवर एकदा अंतिम निवाडा दिल्यानंतरसुद्धा त्या निर्णयाविषयी सर्व विद्यापीठांना अत्यंत चुकीची, उलटी तसेच न्यायनिर्णयाचा अधिक्षेप व अवमान करणारी माहिती पुरविणारा पत्रव्यवहार विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सातत्याने केला गेला. दुर्देवाची आणि दुःखाची गोष्ट अशी की त्याचवेळेला महाराष्ट्र शासनाला विद्यापीठ अनुदान आयोग अशीच अत्यंत चुकीची माहिती पुरवित होते. दिनांक ३ ऑगस्ट २००१ रोजी महाराष्ट्र विधानपरिषद सभागृहात या विषयावर जी चर्चा झाली त्या चर्चेमध्ये राज्याच्या मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी सरळ सरळ असे उद्‌गार काढले की, :- "**यु.जी.सी. असे म्हणते की नेट-सेट १९९१ पासून अनिवार्य आहे. सुप्रीम कोर्टाचे जज्जमेंट वेगळे म्हणते. राज्य सरकारने वारंवार यु.जी.सी.च्या आधाराने आणि बाकीच्या काही गोष्टीच्या आधाराने सभागृहामध्ये तसेच सभागृहाच्या बाहेरही परीक्षा अनिवार्य आहे अशी भूमिका घेतली आहे**" (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : दुसरे अधिवेशन २००१, शुक्रवार, दिनांक ३ ऑगस्ट २००१ अधिकृत प्रतिवेदन, खंड १२५, क्रमांक १५, पृष्ठ १४१)

मा. सर्वोच्च न्यायालयाने सन १९९१ चे रेग्युलेशन हे 'रिकमेंडेटरी' आहे असा एकदा निवाडा दिल्यानंतर ते 'मँडेटरी' आहे असे ठरविण्याचा वा घोषित करण्याचा विद्यापीठ अनुदान आयोगाला या देशाच्या घटनेतील कोणत्याही कलमान्वये अधिकार दिलेला नाही. तसे करून त्यांनी हिमालयाएवढी मोठी चूक केलेली आहे.

**१६.** सातत्याने विद्यापीठ अनुदान आयोग ही चुकीची माहिती महाराष्ट्र शासनाला कळवित राहीले असे स्पष्टपणे दिसून येते. दिनांक ११ डिसेंबर २००१ रोजी "**नेट-सेट परीक्षेच्या स्वरुपाविषयी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला अंतिम निवाडा**" या विषयावरील आमचा तारांकित प्रश्न क्रमांक १९५२१ ला सभागृहामध्ये जे उत्तर देण्यात आले ते याबाबतीत पहाण्यासारखे आहे. "नेट-सेटची परीक्षा उमेदवारांसाठी सक्तीची करणाऱ्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९९१ च्या रेग्युलेशनबाबत एका प्रकरणात (सिव्हील अपील नं.१८१९/१९९४ ए.आय.आर. सुप्रिम कोर्ट ३३६) **सर्वोच्च न्यायालयाने या रेग्युलेशनची तपशीलवार चिकित्सा करणारा अंतिम निर्णय दिला** व विद्यापीठ अनुदान आयोगाचे हे रेग्युलेशन **शिफारशीच्या (रेक्मेंडटरी)** स्वरूपाचे असून त्या शिफारसी राज्य शासनाने किंवा विद्यापीठाने सक्तीच्या केल्यास पुढील काळात सेवेत येणाऱ्या अर्जदारांना लागू राहतील **(प्रॉस्पेक्टीव्ह)** असा स्पष्ट निवाडा सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात दिलेला आहे, हे खरे आहे काय;" या प्रश्न भाग १ ला मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी एका शब्दात "**होय.**" असे ठाम उत्तर दिले होते. खरे म्हणजे अशा रितीने होय उत्तर आल्यामुळे व तो मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय असल्यामुळे ही चर्चा तेथे थांबायला पाहिजे होती व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे कारवाई व्हायला पाहिजे होती. दुर्दैवाने तसे झाले नाही. प्रश्न भाग १ ला होय उत्तर दिल्याबरोबर पूर्णविराम देऊन लगोलग मा. शिक्षणमंत्र्यांनी त्या उत्तरात पुढील वाक्य वापरलेले आहे. "**होय. विद्यापीठ अनुदान आयोगाने केलेल्या खुलास्या अनुसार हे विनियम दिनांक १९ सप्टेंबर १९९१ पासून लागू असून हे अनिवार्य स्वरुपाचे असल्याने सर्व विद्यापीठांना त्यांचे पालन करणे बंधनकारक आहे.**" (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : तिसरे अधिवेशन २००१, दिनांक ११ डिसेंबर २००१ अधिकृत प्रतिवेदन, खंड १२६, क्रमांक ७, पृष्ठ ३९) याचा सरळ अर्थ असा आहे की, महाराष्ट्रामध्ये त्यापूर्वी झालेली, त्यावेळी झालेली व त्यानंतर होत असलेली कारवाई ही सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे झाली नसून विद्यापीठ अनुदान आयोगाने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविषयी लावलेल्या चुकीच्या व उलट अर्थाप्रमाणे झालेली आहे.

**१७.** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे धोरणात्मक निर्णय घेऊन प्रकरणे निकाली काढण्यापेक्षा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा चुकीचा अर्थ लावून एक एक प्रकरण तपासण्यामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगातील अधिकाऱ्यांची गोडी वाढलेली होती. ही गोडी इतकी कमालीची वाढलेली होती की **पुरून पुरून ही प्रकरणे अनेक वर्षे चघळत ठेवण्याचा प्रकार त्यातून घडला.** सर्व विद्यापीठांना चुकीची माहिती पुरवून विद्यापीठ अनुदान आयोगाचे पोट भरले नाही तर त्यांनी महाराष्ट्र शासनालासुद्धा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविषयी चुकीची माहिती पुरविली. **महाराष्ट्र शासनाच्या अधिकाऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय वारंवार लक्षात आणून देऊन सुद्धा समजत नव्हता, वाचता येत नव्हता. अशातला भाग नव्हता परंतु विद्यापीठ अनुदान आयोग सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविषयी चुकीची माहिती पुरवित आहे. ते घोंगडे अनायसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या गळ्यात अडकवून महाराष्ट्र शासनातील अधिकारी मोकळे झाले.**

**१८.** एक एक प्रकरण तपासण्याची ही गोडी इतकी जबरदस्त होती की, विद्यापीठ अनुदान आयोगाने मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद

ITEM NO 70 : **COURT NO.10** : SECTION IX

# SUPREME COURT OF INDIA

**RECORD OF PROCEEDINGS**

Petition(s) for Special Leave to Appeal (Civil) No(s).34118/2013 (From the judgement and order dated 01/08/2013 in WP No.11477/2010 of the HIGH COURT OF BOMBAY AT AURANGABAD)

STATE OF MAHARASHTRA & ORS. : Petitioner(s) ***VERSUS*** ASHA RAMDAS BIDKAR & ORS. : Respondent(s)

(With appln(s) for permission to file synopsis and list of dates,exemption from filing O.T. and prayer for interim relief)

**WITH** S.L.P.(C)...CC NO. 20259 of 2013 (With office report)

## Date: 25/11/2013

This Petition was called on for hearing today.

**CORAM :**

**HON'BLE MR. JUSTICE H.L. GOKHALE : HON'BLE MR. JUSTICE J. CHELAMESWAR**

**FOR PETITIONER(S)** : Mr. B.H. Marlapalle,Sr.Adv., Ms. Asha Gopalan Nair,Adv. **FOR RESPONDENT(S)** : Mr. J.N. Singh,Adv., Mr. Pradeep G. Deshmukh,Adv., Mr. Venkateswara Rao Anumolu,Adv., Mr. Vinay Navare,Adv., Mr. Keshav Ranjan,Adv., Mr. Satyajeet Kumar,Adv., for Ms. Abha R. Sharma,Adv.

**UPON hearing counsel the Court made the following**

## ORDER

Heard the learned counsel for the parties.

Inasmuch as leave is already granted, the matter to come up in its own course.

(A.S. BISHT)
COURT MASTER

(SNEH LATA SHARMA)
COURT MASTER

*परिच्छेद ५ पहा* ** AF : P 217 **

खंडपीठासमोर दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात सरळ सरळ असत्य माहिती शपथेवर नमूद केली. सन २०१० च्या याचिका क्रमांक १०१४९ मध्ये **मा. औरंगाबाद खंडपीठासमोर दिनांक ११ एप्रिल २०११ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने ३६ परिच्छेदांचे एक शपथपत्र दाखल केले आहे.** हे शपथपत्र त्या प्रकरणाच्या पेपर बुकात पृष्ठ ८३ ते १०८ वर दाखल झालेले आहे. या शपथपत्राच्या परिच्छेद १२ मध्ये "UGC's Regulations 1991 on minimum qualification are **MANDATORY** in nature." असे नमूद आहे. **मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा सरळ सरळ चुकीचा व उलट अर्थ शपथपत्रावर उच्च न्यायालयामध्ये सांगण्याचे विद्यापीठ अनुदान आयोगाचे हे धैर्य अलौकिकच म्हणावे लागेल.**

**१९.** मा. सर्वोच्च न्यायालयाने सन १९९१ चे रेग्युलेशन हे रिकमेंडेटरी आहे असा एकदा निवाडा दिल्यानंतर ते मँडेटरी आहे असे ठरविण्याचा वा घोषित करण्याचा विद्यापीठ अनुदान आयोगाला या देशाच्या घटनेतील कोणत्याही कलमान्वये अधिकार दिलेला नाही. **एका बाजूला** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची विद्यापीठ अनुदान आयोगातील (एक एक प्रकरण तपासण्यात विशेष गोडी नसलेले) जे कोणी वरिष्ठ अधिकारी असतील त्यांनी आजही माहिती करून घ्यावी म्हणजे त्यांच्या लक्षात येईल की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कायद्यातील ज्या तरतुदींचा वापर करून १९९१ चे रेग्युलेशन आयोगाने निर्गमित केले होते ते शिफारशींच्या (रिकमेंडटरी) स्वरूपाचे असल्याच्या मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णयामुळेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कायद्यातील वेगळ्या तरतुदींचा वापर करून सन २००० चे रेग्युलेशन विद्यापीठ अनुदान आयोगाला निर्गमित करावे लागले. **दुसऱ्या बाजूला** महाराष्ट्रामध्ये सन १९९१ ते २००० या काळात विद्यापीठ अनुदान आयोगाचे सन १९९१ चे रेग्युलेशन सक्तीचे करण्यात आले नव्हते ही गोष्ट आता विद्यापीठ अनुदान आयोगाला अतिशय जवळून ठाऊक झाली आहे त्याची सुद्धा माहिती करून घेणे/देणे आवश्यक आहे.

**१९.१** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्यावतीने जे निवेदन दि. ३० मार्च २००३ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाला पाठविण्यात आले होते त्याच्या परिच्छेद ३.६ मध्ये स्पष्टपणे पुढील मजकूर नमूद होता. "In Maharashtra, NET/SET qualification, though stated from time to time by the Government, **was never brought into existence as entry point qualification condition by the lawful machinery,** viz,. the Statutes or Directions by the Vice Chancellor of the Universities or the Standard Code by the State Government."

**१९.२** अमरावती विद्यापीठाच्या मा. कुलगुरूंनी विद्यापीठ अनुदान आयोगाला दिनांक १० डिसेंबर २००२ रोजी जे निवेदन पाठविले त्याच्या परिच्छेद ४ मध्ये "Old qualification, New qualification, Cutoff date " याबाबत तपशीलवार माहिती दिली होती. व पुढील बाबी लक्षात आणून दिल्या होत्या :- " This (old) arrangement was continued to be in operation till it is replaced by the new arrangement which came into existance by issuance of Direction No.7 of 1999 on 30.12.1999(Please refer enclosure No. **7**), which prescribes the new qualifications making the NET/SET compulsory at the recruitment level and composition of selection committees for recruitment in the teaching cadre. This Direction was lateron converted to Statute 2 of 2001 (Please refer enclosure No. **9**) as such **it is very clear that the lawful cut-off date for demarking old arrangement and new arrangement is 30.12.1999.**"

**१९.३** नागपूर विद्यापीठाच्या कुलसचिवांनी विद्यापीठ अनुदान आयोगाला १७ डिसेंबर २००२ रोजी एक निवेदन पाठवून आमच्या विद्यापीठात नेट-सेटची पात्रता २८ डिसेंबर १९९९ या दिवशी कुलगुरूंनी काढलेल्या निदेशान्वये लागू झाली त्यापूर्वी नव्हे, असे स्पष्टपणे कळविले होते. महाराष्ट्र शासनाला अधिकार असून सुद्धा त्या अधिकाराचा वापर करून नेट-सेट पात्रता ठरविणारे स्टँडर्ड कोड महाराष्ट्र शासनाने कधीही निर्गमित केले नाहीत. असे नागपूर विद्यापीठाने विद्यापीठ अनुदान आयोगाला पाठविलेल्या त्या निवेदनाच्या परिच्छेद ५ मध्ये नमूद केलेले आहे.

**१९.४** सन १९९१ चे रेग्युलेशन विधिमय माध्यमांच्याद्वारे सन २००० च्या सुरूवातीपर्यंत महाराष्ट्रामध्ये अंमलात आणले नव्हते ही गोष्ट महाराष्ट्रातील जवळजवळ सर्वच विद्यापीठांच्या मा. कुलगुरूंनी विद्यापीठ अनुदान आयोगाला व महाराष्ट्र शासनाला कळविली आहे.

**१९.५** दिनांक ३ ऑगस्ट २००१ रोजी महाराष्ट्र विधानपरिषद सभागृहात या विषयावर जी चर्चा झाली त्या चर्चेमध्ये राज्याच्या मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी सरळ सरळ असे उद्गार काढले की, "सभापती महोदय, ही

ITEM NO MM -A : **COURT NO.10** : SECTION IX

# SUPREME COURT OF INDIA

**RECORD OF PROCEEDINGS**

Petition(s) for Special Leave to Appeal (Civil) No(s).34118/2013 (From the judgement and order dated 01/08/2013 in WP No.11477/2010 of the HIGH COURT OF BOMBAY AT AURANGABAD)

STATE OF MAHARASHTRA & ORS. : Petitioner(s) ***VERSUS*** ASHA RAMDAS BIDKAR & ORS. : Respondent(s)

**WITH**

S.L.P.(C)...CC NO. 20259 of 2013 : These Petitions were MENTIONED today.

## Date: 27/11/2013

**CORAM :**

**HON'BLE MR. JUSTICE H.L. GOKHALE : HON'BLE MR. JUSTICE J. CHELAMESWAR**

**FOR PETITIONER(S)** : Mr. B.H. Marlapalle, Sr. Adv. Ms. Asha Gopalan Nair,AOR. Ms. Abha R. Sharma, AOR **FOR RESPONDENT(S)** : Mr. Prabhakar, Adv. for Mr. Venkateswara Rao Anumolu,AOR.

**UPON BEING MENTIONED the Court made the following**

## O R D E R

Taken on Board. The matter was mentioned by Mr. Marlapalle, learned senior counsel for the petitioner(s). Mr. Prabhakar, counsel is present on behalf of Mr. Anumolu, AOR, counsel for the respondent(s). The following line be added in the Order passed by us on 18.11.2013 :-

**"The above Order will be subject to the final orders to be passed in these appeals".**

SHEETAL DHINGRA
A.R-cum-P.S.

SNEH LATA SHARMA
Court Master

परिच्छेद ५ पहा ** AF : P 219 **

बाब खरी आहे की, १९९१ साली यु.जी.सी.ने रेग्युलेशन्स राज्य सरकारला पाठविले होते. त्यानंतर राज्यसरकारने हे रेग्युलेशन्स विद्यापीठांना पाठवत असतांना ते असाधारण राजपत्रात प्रसिध्द करून पाठवावयास पाहिजे होते. **तसे करण्यात आले असते तर ते लीगल इन्स्ट्रुमेंट ठरले असते. परंतु राज्य सरकारकडून त्या वेळी ही चूक झालेली आहे.**" (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : दुसरे अधिवेशन २००१, शुक्रवार, दिनांक ३ ऑगस्ट २००१ अधिकृत प्रतिवेदन, खंड १२५, क्रमांक १५, पृष्ठ १४१)

**१९.६** सन १९९१ चे रेग्युलेशन हे महाराष्ट्रामध्ये १९ सप्टेंबर १९९१ पासून अंमलात आले नव्हते ही गोष्ट आता खुद्द महाराष्ट्र शासनाने २७ जुन २०१३ रोजी एक शासननिर्णय काढून मान्य केलेली आहे. मात्र त्याच शासन निर्णयामध्ये २३ ऑक्टोबर १९९२ च्या शासन निर्णयाने नेट-सेट लागू करण्यात आल्याचा दावा महाराष्ट्र शासनाने केला आहे. २३ ऑक्टोबर १९९२ चा शासन निर्णय जन्मल्यावर ३५ दिवसांच्या आत मृत्यूमुखी पडला होता याची महाराष्ट्र शासनाला आठवण राहिली नाही हे जेवढे खरे, तेवढेच हेही खरे की त्यानंतर २००१ पर्यंत नेट-सेट सक्तीचे करणारा शासननिर्णय जन्मालाच आला नाही, तर तो जिवंत असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. सारांश काय तर १९९१ ते २००० या काळात नेट-सेट सक्तीचे करणारा कोणताही शासन निर्णय उच्च न्यायालयामध्ये राज्य शासनाला आज पावेतो दाखल करता आलेला नाही.

**१९.७** नेटसेटच्या पात्रतेच्या अटी महाराष्ट्रातील नोकरशाहीने कायदेशीर माध्यमातून महाराष्ट्रात सन २००० पर्यंत अजिबात अमलात आणल्या नाहीत. अशी पात्रता विहित करण्यासाठी विधिमय माध्यमे काय उपलब्ध होती याबाबत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने विद्यापीठ अनुदान आयोगाला दिनांक ३० मार्च २००३ रोजी पाठविलेल्या निवेदनामध्ये परिच्छेद २ मध्ये ते अत्यंत नेटकेपणाने मांडले होते. तो परिच्छेद पुढील प्रमाणे :-

"2. LAWFUL INSTRUMENT FOR PRESCRIBING QUALIFICATIONS :

2.1 The Non-Agricultural Universities in Maharashtra, viz, University of Mumbai, SNDT Women's University, University of Pune, Nagpur University, Amravati University, Shivaji University, North Maharashtra University, Dr. Babasaheb Marathwada University and Ramanand Tirth University are governed by the provisions of the Maharashtra Universities Act, 1994. **Section 51(8) of the said Act provides that Recruitment and Qualifications of the teachers of the Universities and the affiliated colleges is to be regulated by Statutes to be made by the Universities.** In case Statutes do not exist or where Statutes exist but they need to be amended, and if in the opinion of the Universities it is likely to take time before new Statutes could be brought into existence or existing Statutes could be amended, Section 14(8) of the Act provides **the Vice Chancellors with powers to issue directions.**

2.2 Section 8(3) of the said Act empowers the State Government to issue **Standard Cod**e for the purpose of securing and maintaining uniform standards by Notification in the official Gazette.

2.3 It may be pointed out that the UGC is fully aware of such provisions in the Universities Act in different States in the country and therefore in all the Regulations/Notifications that the UGC has been issuing from time to time, the UGC has been emphasizing that it would be necessary for the Universities to make Statutes to implement the UGC Notifications/Regulations."

**१९.८** राज्य शासनाने आपल्या कर्तव्यात कसूर केली, जे करायला पाहिजे होते ते केले नाही यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचाच पुरावा आपण घेऊ. विद्यमान पात्रतेच्या अटी ऐवजी नवीन अटी असलेली व्यवस्था स्थापीत करण्यासाठी काय कृती करावी लागेल, याबाबतच्या तपशीलवार सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने महाराष्ट्र शासनाला दिलेल्या होत्या. दिनांक १४ मार्च १९९१ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाचे सचिव श्री. वाय.एन. चतुर्वेदी यांनी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण खात्याच्या सचिवांना एक पत्र ( D.O.No. F.4-12/86 NET ) पाठवले त्या पत्रात त्यांनी पुढील सूचना स्पष्टपणे दिलेल्या आढळून येतातः-

"We have not so far received acceptance from your state for setting up such state/regional test. For ensuring acceptable standard of those who get selected as Lecturers in colleges/Universities, setting up such a facility is essential and it would be appropriate that

## University Grants Commission

***Bahadur Shah Zafar Marg***
***New Delhi 110002***

BY SPEED POST

No. F.1-1/2008 (PS) Meeting Pt.file

**4 th NOV. 2008**

The Registrar,
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University **Aurangabad - 431 004 .**

**Sub.:** Proposals received from Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad for exemption from NET examination for the appointment as Lecturers in its various affiliated colleges.

Sir.

With reference to the proposal on the above subject, I am directed to inform you that the matter was placed before the Commission at its meeting held on 7th & 8th October, 2008. The Commission was of the view that since no NET qualified/NET exempted candidate was available at the time of interview and had **continued service of 5 or more years the NET/SLET qualification is relaxed in respect of the following candidates** for appointment as Lecturer with the following conditions :-

(i) That the recommended exempted candidate should have been selected by a duly constituted Selection Committee.

(ii) The constitutional provisions of reservation for SC/ST etc. are followed in these selections.

| S. No. | Name of the Candidate /College | Subject/ Date of Appointment |
|---|---|---|
| 1 | Shri. Deore Praful Sahebrao Pandit Jawaharlal Nehru College of Arts & Commerce, Shivaji Nagar, Aurangabad | English 26.12.1999 |
| 2. | to 20 * * * * | * * * * |
| 21. | Shri. Gaikwad Milind Nivratti Arts , Science & Commerce College, Kille Dharur, Dist. Beed (M.S.) | Chemistry 12.9.1995 |

This may also be brought to the notice of the concerned colleges.

Yours faithfully
**(Shashi Munjal)**
Under Secretary

*(परिच्छेद ३.४, ४.१ व ४.२ पहा)*

there is no delay in this regard. Specifically the following actions are required:

1. Acceptance by the State Government in consultation with universities of either the UGC-CSIR test (NET) or a State Educational test as a necessary qualification for recruitment as Lecturer in all the Universities/colleges in the State.

2. Amendment of relevant university statutes for prescribing this as a minimum qualification.

3. Prescribing similarly for each private college and including this as a condition in the grant in aid rules for the private Colleges.

4. Amendment of recruitment rules for Government colleges that qualifying in the UGC-CSIR or State/ Regional test is a minimum qualification for recruitment as lecturer in Govt. Colleges.

*राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात येणाऱ्या महागाई भत्त्याच्या दरात दिनांक १ जुलै, २०१३ पासून सुधारणा करण्याबाबत.....*

**महाराष्ट्र शासन : वित्त विभाग**

**शासन निर्णय क्रमांक मभवा-१११३/प्र.क्र.१८/सेवा- ९**

**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ : तारिख : १५ ऑक्टोबर, २०१३**

**संदर्भ** :- शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक मभवा-१११३/प्र.क्र.१८/ सेवा-९, दिनांक १५ मे, २०१३

**शासन निर्णय :**

राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन असे आदेश देत आहे की, दिनांक १ जुलै, २०१३ पासून सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील (वेतनबँडमधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ८० टक्क्यांवरुन ९० टक्के करण्यात यावा. दि. १ ऑक्टोबर, २०१३ पासून सदर महागाई भत्त्याच्या वाढीची रक्कम रोखीने देण्यात यावी. दि. १ जुलै, २०१३ ते दि. ३० सप्टेंबर, २०१३ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीच्या आहरणाबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

३. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भातील विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे त्याचप्रकारे यापुढेही लागू राहतील.

४. सदर आदेश सुधारित वेतनसंरचनेत वेतन अनुज्ञेय असलेल्या संस्थामधील कर्मचाऱ्यांना योग्य त्या फेरफारासह लागू राहतील.

५. यावर होणारा खर्च संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते या लेखा शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात. या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या वाबतीत, संबंधित प्रमुख लेखा शीर्षाखालील ज्या उप लेखा शिर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उप लेखा शीर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१३१००८१७४३०३६८०५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

| | |
|---|---|
| SHIRISHKUMAR MAHADEV MHATRE | Digitally signed by Shirishkumar Mahadev Mhatre<br>DN : c=IN, o=Government of Maharashtra, ou=Finance Department, postal Code=400 032, st=Maharashtra, cn=Shirishkumar Mahadev Mhatre<br>Date : 2013.10.08 17:42:45+05'30' |

**(शि.म.म्हात्रे)**

सहसचिव, वित्त विभाग

PR :- (7) NB 2011 P 130 (8) NB 2012 P 48 (9) NB 2013 P 08 (10) NB 2013 P 90 (11) NB 2013 P 140 (12) NB 2013 P 247

** FS : P 21 **

5. Designating an appropriate agency in the State for conducting this test. In many States there are arrangements for conducting pre- medical/pre engineering selection tests. This or some other similar organization could conduct the state regional test without adding to administrative expenses".

यापैकी एकाही सूचनेची अंमलबजावणी आमच्या राज्य शासनाने सन २००० पर्यंत केली नाही. याची माहिती विद्यापीठ अनुदान आयोगाला आहे व म्हणून त्यानी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या शपथपत्रात "UGC's Regulations 1991 were not implemented by Govt. of Maharashtra" असे नमूद केलेले आहे.

**१९.९** मुंबई उच्च न्यायालयाच्या मा. औरंगाबाद खंडपीठाने दिनांक १७ ऑक्टोबर २०१३ रोजी सन २०१० च्या याचिका क्रमांक १०१४९ मध्ये जो निर्णय दिलेला आहे त्या निर्णयाच्या परिच्छेद ९ मध्ये स्पष्टपणे पुढील उल्लेख आहे. "It emerges from the affidavit in reply filed by UGC that its regulations of 1991 were not implemented by Government of Maharashtra providing for eligibility tests by UGC or tests accredited by UGC " याच निर्णयाच्या परिच्छेद ११ मध्ये मा. उच्च न्यायालयाने असेही नमूद केले आहे की, "It appears that in 2000, the State government was directed by UGC to make NET/SLET qualification necessary and thereupon, government resolution had been issued directing termination of services of persons appointed after 11-12-1999."

**१९.१०** सन २०१० च्या याचिका क्रमांक १०१४९ मध्ये मा. औरंगाबाद खंडपीठासमोर दिनांक ११ एप्रिल २०११ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने ३६ परिच्छेदांचे एक शपथपत्र दाखल केले आहे. हे शपथपत्र त्या प्रकरणाच्या पेपर बुकात पृष्ठ ८३ ते १०८ वर दाखल झालेले आहे. या शपथपत्राच्या परिच्छेद १२ मध्ये "UGC's Regulations 1991 were not implemented by Govt. of Maharashtra" असे नमूद आहे.

**१९.११** महाराष्ट्रामध्ये सन १९९१ चे रेग्युलेशन लागूच करण्यात आलेले नव्हते ही गोष्ट विद्यापीठ अनुदान आयोगाला आता ठाऊक झालेली असल्यामुळे एक एका प्रकरणामध्ये वेगवेगळे निर्णय देण्याचा खेळखंडोबा विद्यापीठ अनुदान आयोगाने आता बंद केलेला आहे. "**महाराष्ट्र शासनाने सन १९९१ चे रेग्युलेशन महाराष्ट्रात अमलात आणले नव्हते**" हे आता आयोगानेच शपथपत्रावर मान्य केलेले आहे. त्याचबरोबर मा. सर्वोच्च न्यायालयाने सन १९९१ चे रेग्युलेशन हे 'रिकमेंडेटरी' आहे असा एकदा निवाडा दिल्यानंतर ते 'मँडेटरी' आहे असे ठरविण्याचा वा घोषित करण्याचा विद्यापीठ अनुदान आयोगाला या देशाच्या घटनेतील कोणत्याही कलमान्वये अधिकार दिलेला नाही. असे घोषित करून आयोगाने हिमालयाएवढी मोठी चूक केलेली आहे. ही चूक दुरूस्त करण्याची टप्प्यात आलेली कोणतीही संधी आयोगाने दवडता कामा नये. होणारी अप्रतिष्ठा टाळण्याचा तो अत्यंत जवळचा मार्ग आहे.

**२०.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने या कामासाठी नेमलेल्या उच्चस्तरिय समितीने दिनांक ८ डिसेंबर २०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतलेले आहेत. त्यातील एक निर्णय पुढील प्रमाणे :- "आता २०५ प्राध्यापकांच्या प्रकरणी १७ ऑक्टोबर २०१३ रोजीच्या मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या निर्णयामुळे नेट-सेट मुक्ततेबाबतचा हा प्रश्न पुन्हा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या समोर आलेला आहे. ह्याबाबत त्यांनी ४ महिन्यात निर्णय घ्यावयाचा आहे. हा निर्णय घेत असतांना :-

(१) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ८ सप्टेंबर १९९४ रोजीच्या निर्णयाच्या (AIR 1995 Supreme Court 336) परिच्छेद २१ व २४ चे आयोगाने काळजीपूर्वक अवलोकन करावे. त्याचा काळजीपूर्वक अभ्यास करावा, अशी त्यांना विनंती आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा केवळ चुकीचाच नव्हे तर सरळ सरळ उलट अर्थ लावून विद्यापीठ अनुदान आयोगाने किंवा त्यातील अधिकाऱ्यांनी अत्यंत क्षुल्लक हेतुपोटी राष्ट्रीयस्तरावरील हिमालयाएवढी मोठी चूक केलेली आहे. ही चूक दुरुस्त करण्याची शेवटची संधी विद्यापीठ अनुदान आयोगाला या २०५ शिक्षकांच्या प्रकरणी १७ ऑक्टोबर २०१३ रोजी मा. उच्च न्यायालयाने सन २०१३ च्या याचिका क्रमांक १०१४९

मध्ये दिलेल्या निर्णयाने प्राप्त करून दिलेली आहे ही संधी विद्यापीठ अनुदान आयोगाने वाया घालवू नये.

(२) महाराष्ट्रामध्ये १९९१ ते २००० या काळात 'नेट-सेट'चे रेग्युलेशन शिफारसींच्या स्वरूपाचे असल्यामुळे नेट-सेट व्यवस्था कायद्याने लागूच केलेली नव्हती. त्यामुळे "या २०५ शिक्षकांची प्रकरणे सन २००० च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनच्या खंड २ च्या पहिल्या परंतुकांतर्गत येत नसून ते सर्व शिक्षक दुसऱ्या परंतुकान्वये नियमित शिक्षक आहेत व त्यांना नेट-सेट मुक्तता घोषित करण्याची आवश्यकता नाही कारण ते मुळातच नेट-सेट मुक्त आहेत" असे विद्यापीठ अनुदान आयोगाने घोषित करावे.

(३) ८ जुलै २०११ च्या बैठकीमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने महाराष्ट्रातील ज्या सर्व शिक्षकांना नेट-सेट मुक्तता देण्याचा निर्णय घेतला "त्या निर्णयामध्ये अंतर्भूत असलेले सर्व शिक्षक सन २००० च्या नेट-सेट रेग्युलेशनच्या खंड २ च्या दुसऱ्या परंतुकान्वये नियमित शिक्षक आहेत. त्यामुळे ते मुळातच नेट-सेट मुक्त आहेत व त्यांना पहिल्या परंतुकातील तरतुदी लागू पडत नाहीत" असे आयोगाने घोषित करावे.

(४) सन १९९१ चे आमचे रेग्युलेशन हे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे **रिकमेंडटरी स्वरूपाचे होते** असे असतांना विद्यापीठ अनुदान आयोग अनवधानाने म्हणा किंवा जाणून बुजून म्हणा "**सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे, ते मँडेटरी होते**" असे सतत सांगत राहीले, याबद्दल मा. सर्वोच्च न्यायालयाकडे व तत्संबंधी असत्य शपथपत्र दाखल केल्याबद्दल मा.उच्च न्यायालयाकडे आयोगाने क्षमायाचना करावी. असे करण्याची विद्यापीठ अनुदान आयोगाला ही शेवटची संधी आहे.

(५) ज्या ज्या ठिकाणी "सन १९९१ चे रेग्युलेशन हे मँडेटरी आहे" असे विद्यापीठ अनुदान आयोगाने कळविले आहे, त्या त्या सर्व ठिकाणी क्षमायाचना पूर्वक आयोगाने "सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे सन १९९१ चे रेग्युलेशन रिकमेंडटरी होते" असे स्पष्ट शब्दात कळविले पाहिजे.

(६) दहा हजार शिक्षकांची विद्यापीठ अनुदान आयोगाच्या या निर्णयामुळे मोठ्या प्रमाणात ससेहोलपट झाली, महाराष्ट्र शासनाने या चुकीच्या कामाला साथ दिल्यामुळे त्यातून खूप मोठमोठी आंदोलने झालीत, महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्र संपूर्णपणे ढवळून निघाले. शेकडो शिक्षकांना न्यायालयामध्ये प्रकरणे दाखल करावी लागली. त्या प्रकरणामध्ये न्यायालयाने आतापावेतो त्यांना फार मोठा दिलासा दिला असला तरी विद्यापीठ अनुदान आयोगाचे हे 'पुण्य' उघड्यावर आणण्यास अजून पूर्णपणे यश आलेले नाही. ४ महिन्याच्या आत निर्णय घेण्याचा जो आदेश मा. उच्च न्यायालयाने दिलेला आहे, त्याचा विसर विद्यापीठ अनुदान आयोगाने पडू देता कामा नये. तसा विसर आयोगाला पडला तरी महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्र त्यांना तो विसर पडू देणार नाही. या चार महिन्याच्या आत आयोगाने निर्णय न घेतल्यास उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात या विषयावरील याचिका आणि अवमान याचिकांना सामोरे जाण्याची पाळी विद्यापीठ अनुदान आयोगाने स्वतःवर येवू देऊ नये. असे निर्धारपूर्वक नमूद करावेसे वाटते."

**२१.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने या कामासाठी नेमलेल्या उच्चस्तरीय समितीच्या दिनांक ८ डिसेंबर २०१३ रोजी झालेल्या बैठकीच्यावेळी सन २०१० च्या याचिका क्रमांक १०१४९ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक १७ ऑक्टोबर २०१३ रोजी झालेल्या निर्णयामध्ये समाविष्ट असलेल्या २०५ शिक्षकांचे २ प्रतिनिधी मुद्दामहून आले होते. त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. त्यांच्याशी चर्चाही झाली. त्यानंतर त्या दिवशीच्या बैठकीत समितीने आणखी काही महत्वपूर्ण निर्णय घेतले ते पुढील प्रमाणे :-

(१) समितीने निश्चित केलेल्या वर परिच्छेद २० मध्ये नमूद असलेल्या मुद्यांना धरून एक निवेदन (सर्व सहपत्रासह) पुढील १५ दिवसात विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविण्यात यावे. (२०५ प्राध्यापकांच्या प्रतिनिधींनी इच्छा व्यक्त केल्यास त्यांच्यावतीनेसुद्धा तसेच निवेदन पाठवावे.)

(२) विद्यापीठ अनुदान आयोगाने निवेदन मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत महासंघाच्या शिष्टमंडळाला आयोगाच्या अध्यक्षांनी वेळ द्यावी व महासंघाचे म्हणणे ऐकून घ्यावे अशी विनंती करावी.

(३) महासंघाचे म्हणणे ऐकून घेण्यास आयोगाने वेळ दिली नाही तर अवमान याचिकेची तयारी करावी

(४) याच वेळेला मा. सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणी सहभागी होण्याचा अर्ज (Application for Intervention) दाखल करावा असाही निर्णय घेण्यात आला.

**२२.** नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत आता काय स्पष्ट व्हायचे राहीले आहे? सन १९९१ चे नेट-सेटबाबतचे विद्यापीठ अनुदान आयोगाचे रेग्युलेशन हे शिफारसीच्या स्वरूपाचे होते असा मा. सर्वोच्च न्यायालयाचाच निर्णय आहे हे स्पष्ट झालेले आहे, सन १९९१ ते २००० या काळात ते रेग्युलेशन कायदेशीरपणे विधिमय माध्यमाद्वारे महाराष्ट्रात लागू करण्यात आलेले नव्हते हेही स्पष्ट झालेले आहे. काटेकोरपणे कायद्याच्याच भाषेत बोलायचे झाल्यास विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या पात्रता ह्या मा. राज्यपालांच्या मान्यतेने झालेल्या परिनियमान्वये (Statute) ठरतात. असे परिनियम या काळात महाराष्ट्रामध्ये अस्तित्वातच नव्हते. परिनियमांच्या ऐवजी मा. कुलगुरू निदेश (Direction) निर्गमित करू शकतात. असे निदेशसुद्धा त्या काळात निर्गमित झालेले नव्हते, सबंध राज्यामध्ये एकवाक्यता असावी म्हणून प्रमाणसंहिता (Standard Code) हे माध्यम राज्य शासनाला उपलब्ध होते पण तेही निर्गमित करण्यात आलेले नव्हते, ह्या गोष्टी आता मा. न्यायालयातील घडामोडीमुळे स्पष्ट झालेल्या आहेत,

शासन निर्णयाने विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या भरतीसाठीची पात्रता ठरविली जात नाही. तथापि तसा शासननिर्णय सुद्धा त्या काळात अस्तित्वात नव्हता ही गोष्ट सुद्धा आता स्पष्ट झालेली आहे. खुद्द राज्यशासनाने "सप्टेंबर १९९१ पासून ते पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येत नाही" हे २७ जून २०१३ रोजी शासननिर्णय काढून मान्य केले आहे, २३ ऑक्टोबर १९९२ ला आम्ही शासन निर्णय काढला अशी भूमिका राज्यशासनाने घेतली, तो शासननिर्णय पुढच्या ३५ दिवसामध्ये मृत्यूमुखी पडला ही गोष्ट महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने महाराष्ट्र शासनाच्या लक्षात आणून दिल्यावर राज्यशासनाची एवढी फजिती झाली की २३ ऑक्टोबर १९९२ च्या शासननिर्णयाचा साधा उल्लेखसुद्धा मा. सर्वोच्च न्यायालयात करण्याचा शासनाच्या वकिलांना संकोच वाटू लागला आहे.

एकामागून एक मा.उच्च न्यायालयाच्या सात खंडपीठांचे निर्णय विरोधात गेल्यावर तरी निदान राज्य शासनाची आकसबुद्धी संपुष्टात येईल असे या शिक्षकांना वाटत होते. पण शिक्षकांच्या विषयी कमालीची द्वेषभावना मनात धरून असलेल्या अधिकाऱ्यांनी राज्यशासनाला वेठीस धरले असून मा. सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा त्यांनी निर्णय घेतला व या १० हजार प्राध्यापकांना सर्वोच्च न्यायालयात दाखल व्हावे लागत आहे. देशाच्या घटनेने सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा शासनाचा अधिकार कोणीही अमान्य करू शकत नाही. त्यांच्या या अधिकाराचा आम्ही आदर करतो. मात्र त्या निर्णयातून प्रदर्शित होणारी शिक्षकांविषयीची कमालीची द्वेषभावना ही राज्यशासनासाठी निश्चितच अशोभनीय आहे असेच कोणीही म्हणेल. या शिक्षकांनी, त्यांच्या संघटनांनी व शिखरस्थ महासंघाने मा. सर्वोच्च न्यायालयातील या संघर्षाला आदरपूर्वक, धैर्यपूर्वक व हिमतीने सामोरे जाण्याचा निर्णय घेतला आहे.

**२३.** कायदा व नियम यांना धरून वर्तन केले असेल तर त्या वर्तनाचा जय होतो हे खरे असले तरी ते आपोआप घडत नाही. राज्य शासनाचे वर्तन, विद्यापीठ अनुदान आयोगाचे वर्तन हे कायदा व नियमांना धरून नव्हते ही गोष्ट मा. न्यायपीठासमोर कष्टपूर्वक व मेहनतीने सादर करावी लागते व तेथे ती सिध्द झाल्यावरच "आमचे वर्तन कायदा व नियमांना धरून होते" असे म्हणता येते. आपले म्हणणे कितीही योग्य आहे असे आपल्याला वाटत असले तरी न्यायालयामध्ये होणारे निर्णय कायदा, वस्तुस्थिती व समोर आलेली कागदपत्रे यांच्या आधारावर होत असतात आणि त्यामुळे मेहनतीने व कष्टपूर्वक या संघर्षात सहभागी झाले पाहिजे. अपयशाची भिती बाळगण्याचे कोणतेही कारण नसले तरी यश गृहीत धरून संघर्षात उतरणे हे हानीकारकच असते. मा. सर्वोच्च न्यायालयात होणाऱ्या या संघर्षाला सामोरे जातांना तज्ञ अशा विधिज्ञांची फळी उभी करणे व त्यासाठी उत्तम प्रकारचे आर्थिक बळ उभे करणे या दोनही गोष्टी आवश्यक असतात. त्यासाठी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ योग्यवेळी योग्य निर्णय घेत आहे व घेत राहील शिखरस्थ महासंघाच्या त्या निर्णयाच्या पाठीशी केवळ नेट-सेट मुक्त शिक्षकांनीच नव्हे तर इतर सर्व शिक्षकांनी सुद्धा ठामपणे उभे राहीले पाहिजे. जिद्दीने हे काम पूर्ण केले तरच "कायदा व नियम यांचे पालन करणाराचा जय होतो"चे फळ पदरी पडू शकते.

*****

# खाजगी शिक्षण संस्था, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा द्वेष करणाऱ्या काही सनदी अधिकाऱ्यांच्या टोळधाडीपासून बचाव करण्याची आवश्यकता

**प्रा.बी.टी.देशमुख,**

*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

**१.** शिक्षणाकडे गाईचे दूध म्हणून जरी पाहतो म्हटले तरी गाईच्या स्तनातील दूध वासराच्या भूमिकेनेच पिता येते, वेतनेत्तर अनुदान कापा, ग्रेड पे कापा, पे बँड कापा, शिक्षकेत्तर कर्मचारी (संख्या) कापा, शिक्षक (संख्या) कापा, हे काप ते काप, मुख्याध्यापकाच्या गळ्यात वाहतूक व्यवस्थेची घंटी बांधल्याचा ताप, अशा शासकीय नियमांचा आधार घेऊन गोचिडासारखे पितो म्हटले तर फक्त रक्त पिता येईल, दूध पिता येणार नाही. हे ज्यांना कळत नाही ते सनदी अधिकारी शालेय शिक्षणाच्या दोऱ्या हलवत आहेत. चिपळूणकरांसारख्या ज्येष्ठ शिक्षण तज्ञांनी अत्यंत जाणिवपूर्वक त्या क्षेत्रातील सर्व जाणकारांशी चर्चा करून शिक्षण संचालक या नात्याने बऱ्याच महिन्याच्या मेहनतीनंतर शालेय शिक्षणातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध तयार करून शासनाला प्रस्ताव सादर केला. त्यावेळच्या शासनाने तो मान्य केला व त्याप्रमाणे २८ जून १९९४ च्या शासननिर्णयाने तो अमलात आला. हा आकृतीबंध अनेक वर्षे समाधानकारकपणे काम करीत असतांना गेल्या १० वर्षात मात्र त्या आकृतीबंधावर गोचिडांकडून रक्तपिपासू वृत्तीने हल्ल्यावर हल्ले केले जात आहेत.

**२.** शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर आलेल्या या संकटामध्ये सर्वांनी त्यांना साथ देण्याची गरज निर्माण झालेली आहे. शालेय शिक्षणामध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची झोप उडवून टाकणारा एक शासननिर्णय २३ ऑक्टोबर २०१३ रोजी शालेय शिक्षण विभागाने निर्गमित केलेला आहे. खाजगी संस्था व तेथे दिल्या जाणारे शिक्षण, त्यामधून काम करणारे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याविषयी सतत आकसाची भावना बाळगणाऱ्या काही सनदी अधिकाऱ्यांच्या टोळीने तीव्र आकसातून केलेला गेल्या १० वर्षातील हा तिसरा प्रयत्न आहे.

**३.** यापूर्वी एकदा दिनांक २१ नोव्हेंबर २००३ रोजी असाच एक शासन निर्णय काढण्यात आला होता. हजारो कर्मचाऱ्यांना अतिरिक्त ठरविणाऱ्या त्या शासननिर्णयामुळे फार मोठी अस्वस्थता शिक्षण क्षेत्रामध्ये त्यावेळेला निर्माण झाली होती. आम्ही काही सदस्यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये नियम ९३ अन्वये त्या विषयावर चर्चा घडवून आणली. मंत्र्यांना न विचारता सचिव कारभार करतात याबाबत खुद्द मंत्री तक्रार करीत असल्याच्या बातम्या गेल्या २-४ दिवसामध्ये अनेक वृत्तपत्रामधून मुबलकपणे येवून गेलेल्या आहेत, येत आहेत. सभागृहातील चर्चेमुळे मंत्रिमंडळाची मान्यता न घेताच हा शासन निर्णय काढण्यात आलेला आहे व तो खरोखरच शिक्षण क्षेत्राचा उपहास करणारा आहे हे लक्षात आल्याबरोबर तो शासन निर्णय रद्द करण्याची आमची मागणी तत्कालीन मा.शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी मान्य करुन तो जी.आर.रद्द करीत असल्याची घोषणा त्यावेळी सभागृहातच केली होती. खरे म्हणजे शिक्षक प्रतिनिधींनी सभागृहामध्ये फारच जोर लावला तर **"हा शासन निर्णय स्थगित करण्यात येत आहे"** अशी भूमिका राज्यमंत्र्यांनी शासनातर्फे घ्यावी असा सल्ला त्यांना त्या अधिकाऱ्यांनी दिला होता. सभागृहातील रेटा पाहून "स्थगित केले आहे" असे म्हणावयाचे व चार दिवसांनी अधिवेशन संपले की "स्थगिती उठविली आहे" असे जाहीर करण्याचा तो डाव त्यावेळेला हाणून पाडला गेला.

**४.** दि. ११ डिसेंबर २००३ रोजी या प्रश्नावर सभागृहामध्ये खूपच खडाजंगी चर्चा झाली. ही पूर्ण चर्चा देता येणे शक्य नसल्यामुळे त्यातील आवश्यक तेवढे अधिकृत प्रतिवेदन खाली नमूद केले आहे.

*****

### शालेय शिक्षण विभागाने निर्गमित केलेला दि. २१ नोव्हेंबर २००३ रोजीचा घातक, जाचक व हजारो कर्मचाऱ्यांची सेवामुक्ती करणारा शासन निर्णय

*महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : : चौथे अधिवेशन २००३*
*गुरुवार, दिनांक ११ डिसेंबर २००३*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १३३, क्रमांक ४, पृष्ठ क्रमांक ८६ व ८७*

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, एक गोष्ट स्पष्ट झालेली आहे की **आढावा न घेताच हा जी.आर.निघाला आहे. ग्रामीण भागातील शिक्षणाला नेस्तनाबूत करण्याचे हे कारस्थान आहे. मंत्रीमंडळात निर्णय न होताच हा एवढा महत्वाचा शासन निर्णय निघाला.** मंत्रिमंडळामध्ये याबाबतचा निर्णय घेतला असेल तर तो केव्हा घेतला? त्याची तारीख काय आहे ? त्यानुसार हा जी.आर.निघाला आहे काय? आणि मंत्रिमंडळाने निर्णय घेतला नसेल तर त्या अधिकाऱ्यांना त्यांची जागा दाखवून द्या, हा जी.आर.स्थगित करावा अशी मागणी मी करणार नाही तर तो ताबडतोब रद्द करावा, अशी माझी मागणी आहे. त्यानंतर आढावा घेऊन सर्वांशी चर्चा करुन काय निर्णय घ्यायचा तो निर्णय घ्यावा. वर्षानुवर्षे शिक्षणक्षेत्रात काम केलेली ही माणसे आहेत, हा शासन निर्णय रद्द केल्याने कोणी नरकात जाणार नाही. शिक्षण क्षेत्रात काम केलेल्या लोकांशी चर्चा करावी. म्हणून माझी मागणी आहे की, मंत्रिमंडळाने कोणत्या तारखेला निर्णय घेतला व मंत्रिमंडळाच्या निर्णयाशिवाय हा जी.आर.काढला असेल तर तो रद्द केला जाईल काय ?

**श्री.राजेंद्र शिंगणे :** मंत्रिमंडळाने कोणत्या तारखेला निर्णय घेतला याची तारीख माझ्याजवळ नाही. याबाबत निर्णय घेत असताना शासनाने एक उच्चाधिकार समिती नेमली होती.

**श्री.बी.टी.देशमुख :** ही उच्चाधिकार समिती मंत्र्यांची होती की अधिकाऱ्यांची होती ?

**श्री.राजेंद्र शिंगणे :** अधिकाऱ्यांची ही उच्चाधिकार समिती होती. या उच्चाधिकार समितीने हा निर्णय घेतला होता. मंत्रिमंडळाने केव्हा निर्णय घेतला त्याची तारीख माझ्याजवळ नाही. मा.सदस्यांनी सूचना केली आहे **त्याप्रमाणे राज्यातील संस्थाचालक, नामवंत शिक्षण तज्ज्ञ, यांच्याबरोबर बसून चर्चा करुन निर्णय घेतला जाईल. तोपर्यंत हा जी.आर.स्थगित करतो.**

(विरोधी पक्षातील काही मा.सदस्य उभे राहून बोलत असतात.)

**श्री.बी.टी.देशमुख :** हेच तर कटकारस्थान आहे. मंत्री महोदयांनी उत्तर देण्यापूर्वी मी हे सांगितले होते. मला चर्चा ऐकावयास मिळाली आहे ती अशी की, सभागृहात फारच चर्चा झाली, विरोध झाला, तर हा जी.आर.स्थगित करावा, रद्द करु नये, असे अधिकाऱ्यातर्फे सांगण्यात आले आहे. हा त्या अधिकाऱ्यांचा निर्णय आहे. सचिवांची ही उच्चाधिकार समिती असेल तर तुम्ही तुमचा उच्चाधिकार त्यांना दाखवा. मंत्रिमंडळाने याबाबत निर्णय घेतलेला नसल्यामुळे हा शासन निर्णय आजच्या आज रद्द करावा.

**श्री.राजेंद्र शिंगणे :** मंत्रिमंडळाने नेमलेली ही उच्चाधिकार समिती आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** मंत्रिमंडळाने नेमलेली ही सचिवांची उच्चाधिकार समिती असली तरी त्या समितीला संपूर्ण राज्याला जाळण्याचा अधिकार दिला आहे काय ? त्या गरीब कर्मचाऱ्यांना २० रुपये तासाने काम करण्यास सांगता? माझे म्हणणे आहे की, अधिकाऱ्यांना त्यांची जागा दाखवा. त्यांना सांगा की, तुम्ही आमच्याकडे आल्याशिवाय जी.आर.कसा काढला? त्याची चौकशी करावी, जबाबदारी निश्चित करावी आणि हा जी.आर.ताबडतोब रद्द करावा.

**श्री.राजेंद्र शिंगणे :** मी सुरुवातीला सांगितले की, याबाबत निर्णय घेत असताना आपण **राज्यातील शिक्षण क्षेत्रातील नामवंतांशी चर्चा करुन निर्णय घेणार आहोत. तोपर्यंत हा निर्णय लागू करीत नाही, तोपर्यंत हा जी.आर.स्थगित ठेवला आहे.**

(विरोधी पक्षातील काही मा.सदस्य उभे राहून बोलत असतात.)

**श्री.बी.टी.देशमुख :** जी.आर.स्थगित ठेवणे हा त्या मोठ्या कारस्थानाचा भाग आहे. आज स्थगित करण्यात येत आहे असे म्हणायचे व चार दिवसांनी स्थगिती उठविली आहे असे म्हणायचे असे हे कारस्थान आहे.

**श्री. शिवाजी पाटील :** राज्याचे माजी शिक्षण संचालक श्री. चिपळूणकर यांनी शाळा उत्तम प्रकारे चालाव्यात यासाठी अतिशय विचारपूर्वक तो निर्णय घेतलेला आहे. तेव्हा आता जो निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे तो आजच्या आज रद्द करायला पाहिजे.

**श्री. राजेंद्र शिंगणे :** सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेता, तसेच शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व मान्यवरांचा विचार लक्षात घेता शासन हा निर्णय रद्द करीत आहे.

******

**५.** सन २००३ च्या याच अधिवेशनात आमची एक लक्षवेधी सूचना स्विकृत झाली होती. त्याचे उत्तर दिनांक १९ डिसेंबर २००३ रोजी पटलावर ठेवण्यात आले. त्यामध्ये २१ नोव्हेंबर २००३ चा शासननिर्णय १६ डिसेंबर २००३ च्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले होते. त्याबाबतचे अधिकृत प्रतिवेदन पुढील प्रमाणे :-

**हजारो शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना अतिरिक्त ठरविणारा**
**२१ नोव्हेंबर २००३ चा शासन निर्णय**

*महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : : चौथे अधिवेशन २००३*
*शुक्रवार, दिनांक १९ डिसेंबर २००३*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १३३, क्रमांक १०, पृष्ठ क्रमांक २९८*

**डॉ. राजेंद्र शिंगणे, मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे निवेदन**

शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, दिनांक २१ नोव्हेंबर २००३ अन्वये राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी अंशतः/पूर्णतः अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिकचे वर्ग/कनिष्ठ महाविद्यालये व सैनिकी शाळांसाठी शिक्षकेतर पदे अनुज्ञेय करण्याकरिता सुधारित निकष विहित करण्यात आले होते. **सदर शासन निर्णय या विभागाच्या दिनांक १६ डिसेंबर, २००३ च्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आला आहे.**

******

**६.** सनदी अधिकाऱ्यांची ही टोळी वर्ष सहा महिने स्वस्थ बसली व त्यांनी हा प्रयत्न सन २००५ मध्ये शक्तीपूर्ण रितीने पुन्हा पुढे आणला. २५ नोव्हेंबर २००५ या तारखेला त्याच प्रकारचा एक शासन निर्णय पुन्हा निर्गमित करण्यात आला. हे प्रयोग केले जात असतांना शालेय शिक्षणाचे काही भले करण्याचा विचार करून शालेय शिक्षण विभागात कोणी काही मेहनत केली होती अशातला अजिबात भाग नाही. केवळ निधी वाचविण्यासाठी करण्यात आलेली ही कसरत होती. कारण "वित्त विभागाने निर्गमित केलेल्या आदेशानुसार" २००३ मध्ये 'तो' आदेश काढण्यात आलेला होता व त्यामुळेच "आता हा आदेश काढण्यात आलेला आहे" याची कबुलीच अधिकृत कागदपत्रात नमूद आहे व ती कागदपत्रे आमच्या जवळ सुरक्षित आहेत. "शिक्षक संस्थांच्या चालकांशी व त्या संघटनांच्या प्रतिनिधींशी चर्चा करूनच पुढील आदेश काढण्यात येईल" असे आश्वासन वारंवार देण्यात आले पण त्याचे पालन अजिबात झाले नाही.

**७.** दि. २५ नोव्हेंबर २००५ च्या या कौर्यपूर्ण शासननिर्णयावर सभागृहामध्ये नियम ९३ ची सूचना आम्ही उपस्थित केली व त्या निमित्ताने दिनांक १२ डिसेंबर २००५ रोजी सभागृहामध्ये त्यावर कडाक्याची चर्चा झाली. त्यावेळी कर्मचाऱ्यांच्या संघटनांचे अनेक नेते आम्हाला भेटले व हा प्रयत्न हाणून पाडावा अशी त्यांनी विनंती केली. मी त्यांना त्यावेळी असा सल्ला दिला होता की "एकदा रद्द झालेला शासन निर्णय पुन्हा हे सनदी अधिकारी तुमच्या छाताडावर बसवित आहेत. मंत्रिमंडळाची त्याला मान्यता नाही हे नक्की आहे. आम्ही सभागृहामध्ये या विषयावर अनेकदा चर्चा घडवून आणलेली आहे. आता आणखी चर्चा घडवून आणू व तो रद्द करण्याचा प्रयत्न करू पण तुम्ही संघटित होऊन बाहेर हालचाल केल्याशिवाय यावर काही मार्ग निघणार नाही"

**८.** दिनांक १२ डिसेंबर २००५ रोजी महाराष्ट्रभरातून ८ ते १० हजार शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा मोर्चा हा नागपूरच्या विधानभवनावर आलेला होता.

*निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतनावरील महागाई वाढ दिनांक १ जुलै २०१३ पासून ९० टक्के*

# *महाराष्ट्र शासन : वित्त विभाग*

**निर्णय क्रमांक निमवा २०१३/प्र.क्र.७७/सेवा-४ हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, : तारीख : ०९ ऑक्टोबर, २०१३**

***संदर्भ*** *(१) शासन निर्णय क्रमांक, निमवा - २०१३/प्र.क्र.४२/सेवा-४, दिनांक २२ मे, २०१३ व ८ जुलै, २०१३.*

## शासन निर्णय

शासन असा आदेश देत आहे की, राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना त्यांच्या निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन आणि महागाई निवृत्तिवेतन/महागाई कुटुंब निवृत्तीवेतन (असल्यास) यांच्या एकूण रकमेवर दि. १ जुलै, २०१३ पासून अनुज्ञेय महागाई वाढीचा दर ८० टक्के वरून ९० टक्के करण्यात यावा. दिनांक १ ऑक्टोबर, २०१३ पासून सदर महागाई वाढीची रक्कम रोखीने देण्यात यावी. दि. १ जुलै, २०१३ ते दि. ३० सप्टेंबर, २०१३ या कालावधीतील महागाई वाढीच्या थकबाकीच्या आहरणाबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

२. प्रत्येक वैयक्तिक प्रकरणी देय होणाऱ्या महागाई वाढीच्या रकमेची परिगणना करण्याची जबाबदारी ही निवृत्तीवेतन संवितरण प्राधिकरण म्हणजे यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी यांची राहील.

३. शासन असाही आदेश देत आहे की ज्यांना निवृत्तीवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषित्तर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे यामधील निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना वरील निर्णय योग्य त्या फेरफारांसह लागू राहील.

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तीवेतनधारक/कुटुबंनिवृत्तीवेतन धारक यांनाही लागू राहतील.

५. ज्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी सरकारी क्षेत्रातील उपक्रमांमध्ये/स्वायत्त संस्थामध्ये/स्थानिक संस्था इत्यादीमध्ये स्वतःला सामावून घेतल्यानंतर एक रकमी ठोक रक्कम स्वीकारलेली आहे, व जे निवृत्तीवेतनाचा १/३ इतका अंशराशीकृत भाग पुनःस्थापित करण्यासाठी तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक निअंक-१०९९/३०६/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ अनुसार अंशराशीकृत रकमेच्या सुधारणेस पात्र ठरले आहेत, अशा कर्मचाऱ्यांनाही शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक निअंक १००१/५०/सेवा-४, दिनांक ९ एप्रिल २००१ च्या तरतुदीनुसार त्यांच्या पूर्ण निवृत्तीवेतनावर, वरील परिच्छेद -१ मध्ये विहित केलेल्या दिनांकापासून व विहित दराने महागाई वाढ अनुज्ञेय राहील.

६. यासंबंधीचा खर्च वरील परिच्छेदांत नमूद केलेल्या निवृत्तीवेतनधारकांची निवृत्तीवेतने ज्या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात. त्या शिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या शिर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

७. शासनाने वेळोवेळी मंजूर केलेल्या निवृत्तीवेतनावर महागाई वाढी देण्याबाबतचे सध्या अस्तित्वात असलेले सर्व आदेश, योग्य त्या फेरफारांसह, आता मंजूर केलेल्या महागाई वाढीस देखील लागू राहतील.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१००९१७१००१३८०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

९. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

BHOSALE SATISH H
Digitally signed by Bhosale Satish H
DN : c=IN, o=Government of Maharashtra, ou=FD, postal Code=400 032, st=Maharashtra, cn=Bhosale Satish H
Date : 2013.10.09 17:33:31+05'30'

**(स.ह.भोसले)**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

PR :- (7) NB 2011 P 130 (8) NB 2012 P 48 (9) NB 2013 P 08 (10) NB 2013 P 91 (11) NB 2013 P 141 (12) NB 2013 P 250
** FS : P 23 **

दिनांक १२ डिसेंबर २००५ रोजीच या विषयावर सभागृहात चर्चा सुरू झाली. पहिला प्रश्न विचारणाऱ्या सदस्यांनी बरीच माहिती देण्याचा प्रयत्न केला. तेव्हा खुद्द मा. सभापतींनीच "सर्वांना नियम सारखे असतात तुम्ही थोडक्यात प्रश्न विचारा" असे सांगितले त्यानंतर सुद्धा परस्पर विरोधी प्रश्न विचारण्यात आले. त्यात एक प्रश्न हा जी.आर.रद्द करण्यात येईल काय? असाही होता. त्याला मा. शालेय शिक्षण मंत्र्यांनी "**मात्र मी इतकेच सांगू इच्छितो की हा जी.आर. १०० टक्के लागू होईल**" असे उत्तर दिले. मी हात वर करून मा. सभापतींना परवानगी मागत होतो. ती परवानगी मा. सभापतींनी मला दिली. त्यानंतर झालेली चर्चा चर्चा शब्दशः पुढील प्रमाणे :-

**राज्यातील खाजगी अंशतः पूर्णतः अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे सुधारित आकृतीबंधानुसार अतिरिक्त ठरविण्याबाबत**

*महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : : तिसरे अधिवेशन २००५*
*सोमवार, १२ डिसेंबर २००५ (दुपारी २.३० वाजता)*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १४१, क्रमांक ६, पृष्ठ क्रमांक ५१ ते ५४*

**सभापती :** मी सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांना बोलण्याची संधी देत आहे.

**श्री. बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, अतिशय गंभीर असा हा विषय असल्याने मी या संदर्भात केवळ दोन प्रश्न विचारणार आहे त्याची नेमकी उत्तरे माननीय मंत्री महोदयांनी द्यावीत. **माझा पहिला प्रश्न असा आहे की,** या संदर्भात मंत्रिमंडळाने कोणत्या तारखेला निर्णय घेतला? **आणि दुसरा प्रश्न असा आहे की,** कोणकोणत्या संस्था चालकांशी आणि नामवंत शिक्षण तज्ज्ञांशी विचार विनिमय करून हा निर्णय घेतला आहे? सभापती महोदय, मी हे प्रश्न अशासाठी विचारीत आहे की, अशा प्रकारचा जी.आर. काढल्यानंतर या सभागृहामध्ये माननीय मंत्री महोदयांनी तो रद्द केलेला होता. त्यावेळेस त्यांनी दिलेले आश्वासन वाटल्यास मी आपल्याला संबंधित कार्यवाहीतून अगदी पृष्ठ क्रमांकासह वाचून दाखवितो. सभापती महोदय, ११.१२.२००३ च्या सभागृहाच्या कार्यवाहीतील पृष्ठ क्रमांक इइ-१ वर या संबंधात आम्ही प्रश्न विचारला होता की "मंत्रिमंडळाने याबाबत केव्हा निर्णय घेतला?" त्यावर माननीय मंत्री महोदयांनी तेव्हा उत्तर दिले होते की, त्याची तारीख माझ्याकडे नाही. परंतु सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेली आहे त्याप्रमाणे संस्था चालक आणि नामवंत शिक्षण तज्ज्ञ यांच्याबरोबर बसून चर्चा करून याबाबत निर्णय घेतला जाईल. म्हणूनच मी हे दोन प्रश्न विचारले आहेत की, **हा निर्णय मंत्रिमंडळाच्या कोणत्या तारखेच्या बैठकीमध्ये घेतला गेला आहे? आणि एकदा जी.आर.रद्द केल्यानंतर कोणकोणत्या नामवंत शिक्षण तज्ज्ञांशी तसेच संस्था चालकांशी चर्चा करून आपण हा निर्णय घेतला?**

**प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, मंत्रिमंडळाने कधी निर्णय घेतला आहे त्याची तारीख आता माझ्याकडे नाही.** मात्र सचिव समिती आणि संयुक्त समिती या दोघांनी आढावा घेतल्यानंतर, शिक्षण विभागातील लोक आणि शिक्षण क्षेत्रातील काही तज्ज्ञ यांच्याबरोबर चर्चा केल्या नंतर.....

**श्री. बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण द्यावे. मी विचारलेल्या नेमक्या प्रश्नांना मंत्री महोदयांनी नेमकी उत्तरे द्यावीत.... इतर काही सांगू नये.

(काही सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात... अडथळा..)

**सभापती :** मी माननीय मंत्री महोदयांना सागू इच्छीतो की, या संदर्भात **मंत्रिमंडळाने केव्हा निर्णय घेतला याची तारीख व अन्य माहिती आपल्याकडे आता नसेल तर मग हे निवेदन व त्यावरील चर्चा मला आता तहकूब करावी लागेल.** आणि नंतर पूर्ण माहिती आल्यावर यावर चर्चा करणे उचित होईल. तेव्हा मी हे निवेदन तहकूब करीत आहे.

*****

**९.** सभागृहामध्ये दि. १२ डिसेंबर २००५ रोजी दुपारी २.३० वाजता सुरू झालेली ही चर्चा ५-१० मिनिटात संपली. त्यानंतर ४.२५ वाजेपर्यंत घडलेला महत्वपूर्ण घटनाक्रम लक्षात घेणे आवश्यक आहे. शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनांचे काही नेते विधानमंडळात बोलावण्यासाठी आल्यामुळे आम्ही त्यांच्या सोबत मोर्चासमोर गेलो. या मधल्या काळात मा. शालेय शिक्षण मंत्री नामदार श्री वसंतराव पुरके यांनी याबाबत बरीच माहिती घेतली असावी असे दिसून येते. मंत्रीमंडळाची परवानगी न घेताच हा शासन निर्णय काढण्यात आलेला आहे ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली असावी. शालेय शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्याचा कोणताही विचार त्यामागे नसून केवळ वित्त विभागाचा पैसा वाचविण्यासाठी शालेय शिक्षण विभागावर हा शासन निर्णय लादलेला आहे. हेही बहुधा त्यांच्या लक्षात आले असावे असे पुढील घटनाक्रमावरून निश्चितपणे म्हणता येईल.

**१०.** तिकडे शालेय शिक्षण मंत्र्यांनी हा कौर्यपूर्ण शासन निर्णय रद्द करण्यास नकार दिलेला आहे. ही बातमी टी पॉईंटवरील मोर्चामध्ये वाऱ्यासारखी पसरलेली होती. त्यामुळे तीव्र असंतोष व्यक्त करणाऱ्या निषेधाच्या घोषणा सुरू झाल्या होत्या. काही नेत्यांची भाषणे झाली असतांना त्या ठिकाणी मी पोचलो व मला भाषण करण्याची विनंती करण्यात आली. एका मोटारीच्या टपावर उभे राहून भाषण करतांना मी त्या शासन निर्णयाचे कौर्यपूर्ण स्वरूप थोडक्यात सांगितले व त्यानंतर आज सभागृहात काय घडले याचा संक्षिप्त अहवाल सादर केला. ५-१० मिनिटाचे माझे भाषण संपत नाही तोच खुद्द मा. शालेय शिक्षण मंत्री श्री. वसंतराव पुरके हे मोर्चाला सामोरे येत आहेत असे काही लोकांनी मला सांगितले. मी मागे वळून पाहिले तर मंत्रीमहोदय मी उभ्या असलेल्या मोटारीकडे येतांना मला दिसले. **त्यांच्या या दर्शनाने मोर्चाच्या त्या सभेत प्रक्षुब्धतेची भावना निर्माण झाली.** पुन्हा उलट सुलट घोषणा सुरू झाल्या. दरम्यान शिक्षण मंत्री मी उभ्या असलेल्या मोटारीपर्यंत पोचले होते. काहींच्या विनंतीला मान देऊन तेही मोटारीच्या टपावर आलेत. सभा चांगलीच अस्वस्थ झालेली होती.

**११.** जमावातून उलट सुलट घोषणा सुरू होत्या. ती गोष्ट मला योग्य वाटली नाही. मी अतिशय मोजक्या शब्दात "सभागृहात शिक्षण मंत्र्यांना काय करायचा तो विरोध आम्ही करू. राज्यभर आंदोलन करून त्यांना काय विरोध करायचा तोही आपण करू. पण लोकशाही परंपरांचा आदर करून राज्याचे मा. शालेय शिक्षण मंत्री मोर्चाला सामोरे येत आहेत, त्यावेळी त्यांचे म्हणणे आपण शांततेने ऐकून घेतले पाहिजे." असे सांगितले. शेवटी मी "यावेळी उलट सुलट घोषणा देणे हा असभ्यपणाचा व्यवहार होतो. इतरांशी असभ्यपणाचा व्यवहार करणारांनी आपणाशी इतरांनी सभ्यपणाचा व्यवहार करावा अशी अपेक्षा करणे योग्य ठरत नाही. लोकशाही परंपरेचा आदर करून राज्याचे मा. शालेय शिक्षण मंत्री मोर्चाला सामोरे आले आहेत. तेव्हा त्यांचे म्हणणे शांततेने ऐकून घेणे हे आपले कर्तव्य आहे." असे पुन्हा शक्य तेवढ्या मोठ्या आवाजात मी सांगितले. यावेळेला मात्र जमाव शांत झाला.

**१२.** पुढच्या दोन तीन मिनिटामध्ये मी आता तुमच्याशी बोलत नसून मा. शिक्षण मंत्र्याशी बोलत आहे, असे सांगितले व हा कौर्यपूर्ण शासन निर्णय रद्द करण्याची आवश्यकता त्या सभेत मोटारीच्या टपावर माझ्या बाजूला उभ्या असलेल्या मंत्रिमहोदयांना सभेत भाषण देतच सांगितली व हा शासननिर्णय रद्द करावा अशी विनंती करून माईक मा. शिक्षण मंत्र्यांच्या हातात दिला. माझा असा समज आहे की मा. शालेय शिक्षण मंत्री त्याबाबतचा पूर्ण विचार करूनच मोर्चाकडे आले होते. २-४ मिनिटाच्या भाषणात थोडी प्रास्ताविक माहिती देऊन **"हा शासन निर्णय आपण रद्द करीत आहोत" असे त्यांनी जाहीर केले. मोर्चेकरांनी त्यावेळी केलेला टाळ्यांचा प्रचंड कडकडाट मी कधीही विसरू शकणार नाही.**

**१३.** मोटारीच्या टपावरून आम्ही दोघेही खाली उतरलो. त्यांच्या शासकीय वाहनापर्यंत त्यांना सोडायला म्हणून आम्ही काही प्रतिनिधी त्यांच्या सोबत गेलो. मोटारीत बसण्यापूर्वी मी दोन मिनिटासाठी बाजूला बोलावून श्री. वसंतराव पुरके यांना असे म्हणालो की "वसंतराव! आपण ज्या जिव्हाळ्याने या प्रश्नात भूमिका घेतली त्यामुळे आम्हा सर्वांना खरोखरच आनंद झाला आहे. पण त्यामुळेच तुम्हाला सावध करणे मला माझे कर्तव्य वाटते. आता तुम्ही **मोर्चासमोर शासन निर्णय रद्द करण्याची घोषणा केली.** दिड दोन तासापूर्वी "**आपण शासन निर्णय रद्द करणार नाही शंभर टक्के अमलात आणू**" अशी सभागृहात घोषणा केली. उद्या विरोधक विशेष हक्कभंगाचा ठराव तुमच्या विरोधात मांडतील. यामध्ये औचित्यभंग निश्चितच होतो. तुम्ही चांगला निर्णय घेतला तेव्हा याची काळजी घ्या"

**१४.** त्यावर ते मला म्हणाले "बी.टी सर! मग याबाबतीत काय करायला पाहिजे ते तुम्हीच सांगा ना !" त्यावर मी त्यांना असे म्हणालो "मा. मंत्री या नात्याने तुम्हाला नियम ४६ अन्वये केंव्हाही आणि कधीही सभागृहात निवेदन करता येते. आपण जाऊन मा. सभापतींना भेटा व त्यांची परवानगी घेऊन तसे निवेदन करा म्हणजे हे हक्कभंगाचे 'बालंट' निश्चितच टळेल" मी असे म्हटल्याबरोबर मा. शिक्षण मंत्री मला म्हणाले "बी.टी.सर हे येथील आता राहू द्या. बाकीचे लोक येथे पहातील. आपण दोघेही आताच मा. सभापतींकडे जावू" शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यावरील एक मोठे संकट त्यांनी टाळल्यामुळे मी त्यांच्या विनंतीला नकार देण्याचा प्रश्नच नव्हता. मा. शिक्षण मंत्र्यांच्याच शासकीय वाहनात बसून आम्ही दोघेही विधानभवनात मा. सभापती श्री शिवाजीराव देशमुख यांच्या दालनात दाखल झालो. याबाबतची वस्तुस्थिती त्यांना सांगितली. त्यांच्याच कार्यालयात लहानसे निवेदन तयार केले. मा. सभापतींची परवानगी घेतली व सभागृहात आमच्या 'स्वाऱ्या' दाखल झाल्या. मा. शालेय शिक्षण मंत्र्यांनी दुपारी ४.२५ वाजता सभागृहात नियम ४६ अन्वये निवेदन केले.

त्याचे अधिकृत प्रतिवेदन पुढील प्रमाणे :-

******

**राज्यातील मान्यताप्राप्त शाळांतील शिक्षकेत्तर पदांचे सुधारित निकष विहित करणारा शासन निर्णय रद्द करण्यासंबंधी माननिय शालेय शिक्षण मंत्र्यांचे निवेदन**

*(नियम ४६ अन्वये)*

*महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : : तिसरे अधिवेशन २००५*
*सोमवार, १२ डिसेंबर २००५ (दुपारी ४.२५ वाजता)*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १४१, क्रमांक ६, पृष्ठ क्रमांक ८५*

**प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) :** सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम ४६ अन्वये पुढील निवेदन करतो.

"राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अंशतः/पूर्णतः अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिकांचे वर्ग/कनिष्ठ महाविद्यालये व सैनिकी शाळांसाठी शिक्षकेतर पदे अनुज्ञेय करण्याकरीता सुधारीत निकष विहित करणेबाबतचा दिनांक २५ नोव्हेंबर २००५ रोजीच्या शासन निर्णयाबाबत आज दिनांक १२.१२.२००५ रोजी नियम ९३ अन्वये सभागृहात चर्चा झाली. **या संदर्भात संबंधितांशी चर्चा करून मी असे जाहीर करतो की, दिनांक २५ नोव्हेंबर २००५ रोजीचा शासन निर्णय रद्द करण्यात आलेला आहे.**

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी योग्य निर्णय घेतल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. एक लहानसे क्लॅरीफिकेशन पाहिजे म्हणून मी विचारू इच्छितो की, या सभागृहामध्ये माननीय राज्यमंत्र्यांनी "सर्व संस्था चालकांचे प्रतिनिधी, नामवंत शिक्षण तज्ज्ञ यांचेबरोबर बसून चर्चा करुन निर्णय घेतला जाईल" असे दि. ११.१२.२००३ ला आश्वासन दिले होते. माझे असे म्हणणे आहे की, याबाबतीत यापुढे कोणत्याही प्रकारचा **निर्णय घेतांना संस्था प्रमुखांचे प्रतिनिधी, संबंधित संघटनांचे प्रतिनिधी व नामवंत शिक्षण तज्ज्ञ व त्यांचे प्रतिनिधींबरोबर चर्चा करून निर्णय प्रक्रिया केली जाईल असे आश्वासन मा. मंत्रिमहोदय देतील काय ?**

**प्रा. वसंत पुरके :** सभापती महोदया, चर्चा करुन निर्णय घेतला जाईल

******

**१५.** खाजगी शिक्षण संस्था, त्यातील शिक्षण,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा द्वेष करणाऱ्या काही सनदी अधिकाऱ्यांच्या टोळीपासून या व्यवस्थेचा बचाव करण्याची नितांत गरज निर्माण झालेली आहे. या एकूण क्षेत्राबद्दल कांही अधिकाऱ्यांच्या मनामध्ये तीव्र आकसाची भावना असल्यामुळेच सहाव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करतांना सर्वच स्तरावरील शिक्षकांना अत्यंत निम्न दर्जाची वागणूक देण्यात आली. हकीम सारख्या एका सनदी अधिकाऱ्याचा वापर करून नोकरशाहीने हे कारस्थान पार पाडले त्याला राजकीय नेतृत्त्वसुद्धा आवर घालू शकले नाही. वस्तुतः "राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेण्या सुधारण्याकरिता राज्य शासनाकडून स्वतंत्र वेतन आयोग नियुक्त न करता केंद्र शासन जेव्हा जेव्हा केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी वेतन आयोग नियुक्त करील तेव्हा तेव्हा त्या वेतन आयोगाच्या शिफारसीवरील केंद्र शासनाचे वेतन विषयक निर्णय (Decisions of the Central Government on the Commission's recommendations in regard to pay scales) **राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या तुलनीय प्रवर्गांना लागू करण्यात येतील. वेतन निश्चितीचे सूत्र देखील केंद्र शासनाप्रमाणे असेल.**" असा धोरणात्मक निर्णय डिसेंबर १९७७ मध्ये राज्यशासनाने घेतला होता. आजपावेतो या धोरणात्मक निर्णयामध्ये शासनाच्या स्तरावर बदल झालेला नाही.

**१६.** राज्यशासनाचा उपरोक्त धोरणात्मक निर्णय आजही कायम आहे. तो बदललेला नाही असे असतांना सर्व स्तरावरच्या शिक्षकांच्या ग्रेड पे मध्ये मोठ्या प्रमाणात कापाकापी करण्यात आली. काही बाबतीत तर पे बँड सुद्धा बदलण्यात आले. ही कापाकापी किती निर्दयपणे करण्यात आलेली आहे हे पहाण्यासारखे आहे. **(१) प्राथमिक शिक्षक :** सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारसीवर केंद्र शासनाने प्राथमिक शिक्षकाला मूळ वेतनश्रेणीसाठी दुसऱ्या वेतनपट्ट्यात (पे बँड २ मध्ये) ४२०० रुपये ग्रेड पे दिला आहे. तो कापून राज्य शासनाने त्याला दुसऱ्या म्हणजे ४८०० वर सुरू होणाऱ्या पे बँड मधून पहिल्या म्हणजे २८०० रुपयावर सुरू होणाऱ्या पे बँड मध्ये ढकलून दिले व त्यांचा ग्रेड पे ४२०० वरून २८०० वर आणला.म्हणजे पे बँड कापला व ग्रेड पे सुद्धा कापला. प्राथमिक शिक्षकांच्या वरिष्ठ श्रेणीला केंद्राने ४६०० रुपये ग्रेड पे दिला तर राज्य शासनाने तो ४२०० रुपये ग्रेड पे केला. निवडश्रेणीला केंद्राने ४८०० रुपये ग्रेड पे दिला तर राज्यशासनाने तो ४३०० रुपये केला. **(२) माध्यमिक शिक्षक :** केंद्राने मूळ वेतनश्रेणीसाठी दुसऱ्या वेतनपट्ट्यात (पे बँड २ मध्ये) ४६०० रुपये ग्रेड पे दिला आहे तो कापून राज्यशासनाने ४३०० रुपये केला. वरिष्ठ श्रेणीला केंद्राने ४८०० रुपये ग्रेड पे दिला तर राज्यशासनाने तो ४४०० रुपये केला व निवडश्रेणीला केंद्राने दिलेले ५४०० रुपये ग्रेड पे दिला तर राज्यशासनाने ४८०० रुपये केला. **(३) कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक :** केंद्राने मूळ वेतनश्रेणीसाठी दुसऱ्या वेतनपट्ट्यात (पे बँड २ मध्ये) ४८०० रुपये ग्रेड पे दिला तर तो कापून राज्यशासनाने ४६०० रुपये केला निवडश्रेणीबाबत केंद्रशासनाने दिलेल्या ६६०० रुपये ग्रेड पे मध्ये मोठी कपात करून राज्यशासनाने तो ग्रेड पे ५७०० रुपये केला. **(४) विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक :** या वर्गाबद्दल तर अधिकाऱ्यांच्या आकसपूर्ण वागणूकीने कमाल मर्यादा गाठलेली दिसते. अर्थात तो वेगळा विषय आहे. शालेय शिक्षण विभागात घुसलेली ही टोळधाड आता शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यावर घसरलेली आहे.

**१७. शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर कापून काढणारा** "राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अंशतः/पूर्णतः अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक व सैनिकी शाळांसाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी सुधारित आकृतीबंध लागू करणे" या विषयावरील महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचा, शासन निर्णय क्रमांक : एसएसएन-१००८/(२००/०८)/माशि-२ हा शासन निर्णय दिनांक २३ ऑक्टोबर २०१३ रोजी निर्गमित झाला असून **शाळासंहितेचे निकष यापुढे चालणार नाहीत. चिपळूणकरांचे निकष यापुढे कोणत्याही परिस्थितीत चालणार नाहीत असा स्पष्ट उल्लेख या शासननिर्णयाच्या परिच्छेद ४ मध्ये आहे.**

**१८. शिक्षकांच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात कपात करणारा** "माध्यमिक शाळांना (इयत्ता ९ वी व १० वी) नवीन तुकड्या मंजूर करणे, सुरु ठेवणे व टिकविणेबाबतचे निकष" या विषयावरील महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने काढलेला शासन निर्णय क्रमांक : माशातु-२०१३/(१०७/१३)/माशि-१, हुतात्मा राजगुरु मार्ग चौक, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२ हा शासननिर्णय दिनांक २० नोव्हेंबर २०१३ रोजी निर्गमित झाला असून तो शाळांपर्यंत पोहचलाही नाही तर त्याच शासननिर्णयात "वरीलप्रमाणे कमी/अधिक होणारी विद्यार्थीसंख्या विचारात घेऊन कमी होणाऱ्या तुकड्यांबाबत प्रचलित नियमानुसार समायोजनाची कार्यवाही करावी. तसेच ज्या ठिकाणी अतिरिक्त/जादा तुकडी मंजूरीची आवश्यकता आहे त्याबाबतचा शिफारशीसह प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी संबंधित उपसंचालकांकडे वरील माहितीसह दिनांक ३१ ऑक्टोबर पर्यंत पाठवावा" अशी तरतूद टाकण्यात आली आहे. सन २०१३ या वर्षामध्येच नव्हे, **तर कोणत्याही वर्षामध्ये ३१ ऑक्टोबर ही तारीख २० नोव्हेंबरच्या अगोदर येत असते एवढेसुद्धा मंत्रालयात किंवा सचिवालयात कुणालाही कळू नये हे आश्चर्यच म्हटले पाहिजे.**

*****

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2012-14 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **16.12.2013**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 602**.

---------------------------------------------------

To,......................................................................

.........................................................................

.........................................................................

.........................................................................